
# २६/११चे अमर हुतात्मे

– संजय वाघ



# २६/११चे
# अमर हुतात्मे

संजय वाघ

प्राजक्ता प्रकाशन, नाशिक

ebook by : www.esahity.com

**२६/११ चे अमर हुतात्मे** (शौर्यगाथा)
संजय वाघ

**26/11 che Amar Hutatme (**Stories of bravery**)**
by Sanjay Wagh

**प्रथम आवृत्ती :** २६ नोव्हेंबर, २००९
**द्वितीय आवृत्ती :** २४ जून, २०१०

**प्रकाशक :**
प्राजक्ता प्रकाशन
२, सागर रो-हाऊसेस,
दत्तधाम चौक, पाटीलनगर,
सिडको, नाशिक- ४२२००९
[redacted]

© **संजय वाघ, २००९**

**अक्षरजुळणी व मांडणी :**
विजय चौधरी

**सजावट:**
सुभाष महाले/योगेश फेगडे

**मुखपृष्ठ :**
नंदू गवांदे

**मुद्रक :**
त्रिमूर्ती फाईन आर्टस्,
एमआयडीसी, सातपूर, नाशिक

**मूल्य :** १७५ रुपये

**पृष्ठसंख्या :** २००

माझ्या देशबांधवांनो

ई साहित्य प्रतिष्ठान दर वेळी ई पुस्तकांचा पुरस्कार करते. पण या वेळी एका P-पुस्तकाचा ( पेपर पुस्तकाचा) पुरस्कार आम्ही करीत आहोत. ते पुस्तक आहे : श्री संजय वाघ लिखित " २६/११ चे अमर हुतात्मे"

पंधरा ऑगस्ट जवळ आला की, आपले देशप्रेम उफाळून येते. आपण सर्वजण आपल्या देशावर प्रेम करतो. आपला देश सुरक्षित रहावा आणि सतत प्रगती करत रहावा अशी इच्छा मनात बाळगतो. त्यासाठी आपण आपआपली कर्तव्यं पार पाडत असतो. देशात चहूबाजूंना भ्रष्टाचार सुरू आहे. दहशतवादाने थैमान घातले आहे. राजकारणी मंडळी आणि सरकारच्या सर्व स्तरांवर लोक देशाला वाळवी बनून पोखरत असतात हे आपण वाचतो आणि बघतो. शिक्षणापासून ते संरक्षणापर्यंत आणि कृषी पासून क्रीडापर्यंत सर्वच क्षेत्रं ही कमाईची कुरणं बनत आहेत. घोटाळयांचे नवनवे "आदर्श" उंचावत आहेत.  नोकऱ्यांचा प्रश्न ऊग्र बनतो आहे.

नेत्यांची नीतीच गहाण आहे.
तरीही भारत महान आहे.

हो,  खरोखरच भारत महान आहे. कारण एवढ्या सर्व रावणांना पुरून उरणारे राम या देशात आहेत. देशाच्या प्रगतीसाठी झटणारे असंख्यजण आपआपल्या कामात गर्क आहेत. हे लोक शिक्षण क्षेत्रात आहेत, संरक्षण दलांत आहेत, सरकारात आहेत, राजकारण्यांतही आहेत, आपल्या आजूबाजूला सर्वत्र आहेत. आणि म्हणून हा देश खरोखरच प्रगती करतो आहे. आजही हा देश अखंड आहे. वेगवेगळया रुपांत हे लोक देशाची सेवा निरपेक्ष भावनेने करत असतात. स्वतःची नेमून दिलेली कर्तव्यं चोख बजावत असतात. इतरांना आपल्या कामातून प्रेरणा देतात.  आणि प्रसंगी स्वतःच्या जीवाची बाजी लावतात. या देशासाठी शेकडो जवान आपल्या प्राणांची आहुती दरसाल देत असतात. पोलिसदलातील सर्वजण केवळ "कमाई"च्या मागे असते तर हा देश चाललाच नसता.  आपल्या नवीन पिढीला हेही सांगण्याची गरज आहे. मुलांना जर आपण कायम रावणांच्याच गोष्टी सांगितल्या तर उद्या त्यांच्यातून नवे रावण तयार होतील. त्यांना समाजातल्या या रामांच्या कथा कळल्या पाहिजेत. त्यांना आजच्या काळातील खरे उंच आदर्श दिसायला हवेत.

आज आम्ही आपल्यासमोर अशाच आजच्या काळातील रामांची कथा असलेली एक पुस्तिका  ठेवत आहोत. आज आम्ही जी पुस्तिका आपल्यासमोर ठेवत आहोत ती आजच्या काळातील रामांची कथा आहे. स्वतःच्या जीवाची पर्वा न करता दहशतवाद्यांशी चार हात करता करता धारातिर्थी पडलेल्या अठरा पोलिस जवानांची ही कथा आहे.

ebook by : www.esahity.com

नाशिक येथील पत्रकार श्री संजय वाघ यांनी लिहिलेले हे पुस्तक. सव्वीस नोव्हेंबर २००८ च्या मुंबई हल्ल्यात प्राणांची आहुती देणाऱ्या अठरा जवानांची ही शौर्यगाथा आहे. २६ नोव्हेंबर नंतर सोळाव्या दिवशी संजय यांनी मुंबई गाठली. या सर्व अठरा हुतात्म्यांची माहिती गोळा केली. एखाद्या तीर्थयात्रेला जावे तसे या सर्व अठराजणांच्या हौतात्म्याच्या स्थळांना भेट दिली. त्या क्षणांची संपूर्ण माहिती मिळवली. एक संपूर्ण इतिहास स्वतःच्या नजरेसमोर उभा केला. त्या प्रत्येक शूर हुतात्म्यांच्या घराला भेट दिली. त्यांच्या कुटुंबियांना भेटले. त्यांचे सांत्वन केले. त्यांची विचारपूस केली. प्रत्येकाची पूर्वपिठीका जाणून घेतली. त्यांचे जुने फ़ोटो, आठवणी मिळवल्या आणि हे सर्व चित्र आपल्या विलक्षण लक्षवेधी लेखणीतून जिवंतपणे शब्दबद्ध केले. हे सर्व स्वखर्चाने, कोणत्याही अपेक्षेशिवाय. हे हौतात्म्य जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचावे या भावनेने. शिवरायांच्या नांवाने उभे असणाऱ्या छत्रपती शिवाजी टर्मिनसच्या साक्षीने घडलेला हा इतिहास शिवरायांचे नांव सांगणाऱ्या महाराष्ट्रात घरोघरी पोचलाच पाहिजे याच भावनेने हे काम त्यांनी केले.

त्यातील काही भाग आज आम्ही आपल्यासमोर ठेवत आहोत. प्रत्येक वाचकाने विशेषतः आजच्या तरुण पिढीने वाचायलाच हवे असे हे पुस्तक आहे. हे संपूर्ण पुस्तक ई मेलच्या आवाक्याबाहेरचं आहे. म्हणून आमचं वाचकांना हे आवाहन आहे की या मूळ पुस्तकाच्या प्रती मागवून घ्या. नाशिक येथीलच प्राजक्ता प्रकाशनने प्रकाशित केलेलं हे पुस्तक १७५ रुपयांना उपलब्ध आहे. त्या पेपर पुस्तकाच्या प्रती आपल्या मुलांना, आपल्या शाळेत, जवळच्या आप्त आणि मित्रांना भेट द्या. हा पंधरा ऑगस्ट आपण या रितीने साजरा करूया. आपण व्हॅलेंटाईन डे ला गिफ़्ट देतो. दिवाळी आणि दसऱ्याला देतो. मग आपल्या राष्ट्रीय सणांना का देऊ नयेत? नव्या पिढीसमोर नवे आदर्श उभे करण्याची जबाबदारी आपणच का घेऊ नये? कसाबला फ़ाशी व्हायला हवीच. पण त्याच बरोबर ज्या धाडसी पोलिसांनी आपले प्राण देशासाठी वाहिले त्यांची नांवं अमर व्हायला हवीत. नाहीतर कसाब फ़ेमस होईल आणि ओंबळे विसरले जातील. रावणाचं नांव लक्षात राहील आणि राम कोण ते आठवणार नाही.

मित्रांनो, आजच आपल्याला हव्या असलेल्या प्रतींची ऑर्डर नोंदवा. त्यसाठी संपर्काचा पत्ता.

संजय वाघ
हिराई, ०२, सागर रो हाउसेस, दत्तधाम चौक
पाटीलनगर, सिडको, नाशिक, ४२२००९

फ़ोन : ९९२२९०४०७२/ ९८९०२२३१२६

ई मेल : sanjaywagh92@gmail.com

माणूस किती जगला याला मोल नाही,
त्याच्या जगण्याचा जगाला किती उपयोग झाला
याला मोल आहे.
मृत्यूनंतरसुद्धा ज्यांच्या स्मृती
दुनिया जतन करून ठेवते,
ज्यांच्यासाठी अश्रू ढाळते ते खरे मृत्युंजय.
२६/११ ला अतिरेक्यांनी केलेल्या
भ्याड हल्ल्यातून मुंबईची सहीसलामत
सुटका करण्यासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या
भारतमातेच्या त्या 'जिगरबाज' १८ जवानांना
आणि -
शहिदांच्या हौतात्म्यानंतर
कोलमडून पडलेल्या त्यांच्या कुटुंबीयांना
आधार देण्यासाठी पुढे सरसावलेल्या
लाखो 'दिलदार' हातांना...

ebook by : www.esahity.com

# संख्यात्मक

आतंकवादी बंदुकांना
दररोज आपल्या प्राणांचा
रतीब घालणाऱ्या
भारतीय नागरिकांनो,
तुम्ही मरत रहा
शक्य तर देशाच्या एकतेसाठी
आपण मरत आहोत
या समाधानानं.
तुमच्यासाठी डोळ्यात आसवं तर राहोच;
पण काळजात अस्वस्थतेचा सलही
आता आमच्याजवळ शिल्लक नाही...
आता तुमच्यासाठी आहे
फक्त निर्विकार कुतूहल
तुमच्या संख्येचं...
तुमच्या बलिदानाची नोंद
सकाळी उगवून संध्याकाळी मावळणारी
वृत्तपत्र घेतील, घेतातही
तीही संख्यात्मक...
ताम्रपटावर खोदला जाणारा
इतिहास मात्र
तुम्हाला कधीही घेणार नाही
आपल्या पोटाशी
अखेर इतिहासदेखील
मोठ्यांच्या नावाशी
सिंहासनाच्या पायाशी बांधलेला...
पायात पुरलेल्या दगडांनी
कळसाचे नशीब कधी मागू नये
म्हणून हे भारतीयांनो,
तुम्ही मरत रहा अनासक्त वृत्तीनं
आम्ही फक्त मोजत राहू
काल तितके
आज इतके...

**– कुसुमाग्रज**

# अनुक्रम


- हृद्य संवाद...वाचकांशी/८
- प्रस्तावना– प्राचार्य डॉ. श्रीपाल सबनीस/१७
- अभूतपूर्व हल्ला/२२
- अमर हुतात्मे :
    - १) हेमंत करकरे/३६
    - २) विजय साळसकर/४८
    - ३) अशोक कामटे/६२
    - ४) तुकाराम ओंबळे/७०
    - ५) शशांक शिंदे/८०
    - ६) अंबादास पवार/८८
    - ७) मुकेश जाधव/९६
    - ८) मुरलीधर चौधरी/१०४
    - ९) राहुल शिंदे/११२
    - १०) प्रकाश मोरे/१२०
    - ११) विजय खांडेकर/१२६
    - १२) बापूराव धुरगुडे/१३२
    - १३) बळवंत भोसले/१३८
    - १४) जयवंत पाटील/१४८
    - १५) योगेश पाटील/१५६
    - १६) अरुण चित्ते/१६८
    - १७) संदीप उन्नीकृष्णन/१७८
    - १८) गजेंद्रसिंग बिश्त/१८६
- कसाबचा जवाब/१९४


ebook by : www.esahity.com

# हृद्य संवाद... वाचकांशी

**२६** नोव्हेंबर, २००८ च्या रात्री मुंबईवर झालेला अतिरेक्यांचा हल्ला केवळ मुंबईपुरताच मर्यादित नव्हता, आतापर्यंत भारतावर झालेला सर्वात मोठा अतिरेकी हल्ला म्हणून त्याची नोंद झालेली आहे. मुंबईवर हल्ला झाल्याने देशभरातील जनता कमालीची हळहळली. या हल्ल्याच्या निमित्ताने केवळ मुंबईतच नव्हे तर सर्वसामान्य माणूस भारतात किती असुरक्षित झालेला आहे हेच यातून सिद्ध झाले. हल्ला करणारे अतिरेकी पाकिस्तानचे नागरिक असल्याचे पुरावे जेव्हा समोर आले, तेव्हा प्रत्येक संवेदनशील माणसाने आपापल्या जागेवर मुठी आवळून सात्त्विक संताप व्यक्त केला. यापलीकडे आपण दुसरे करू तरी काय शकतो? ज्यांनी काहीतरी करायला हवे, ते कोणतीही बाब गांभीर्याने घेत नाहीत हेच तर आपले खरे दुखणे आहे. महासत्ता बनण्याच्या दिशेने पाऊल टाकलेला आपला फक्त बोलण्यापुरता असलेला भारत आजही बहुतांशी बाबतीत पिछाडीवर आहे. प्रगतीच्या दिशेने पाऊल टाकतांना अधोगतीकडे नेणारे मार्ग आपण कायमचे बंद करायला हवेत, ही साधी गोष्ट आपल्याला कळू नये यास काय म्हणावे?

मुंबईत जे अतिरेकी शिरले, ते केवळ त्याच दिवशी आलेले नव्हते. तो त्यांचा नियोजनबद्ध कट होता. या आधी येऊन त्यांनी सर्व मुंबईची पाहणी केली, गर्दीची ठिकाणे हेरली, कोठे लपता येईल, कोठे शस्त्रसाठा लपवता येईल, कोठून हल्ला करता येईल याचा सर्व अभ्यास हल्ल्याशी निगडित सर्वांनी केलेला होता. ठिकठिकाणच्या स्थळांच्या चित्रफिती काढलेल्या होत्या, नकाशे तयार केले होते. ही सर्व आखणी त्यांनी जेव्हा केली, तोपर्यंत आपण काय झोपलेलो होतो काय, असा सवालही यानिमित्ताने उपस्थित झाल्यावाचून राहत नाही. धार्मिकस्थळी जाऊन महाराष्ट्रातील एखाद्या भाविक माणसाने देवाच्या मूर्तीची छबी आपल्या कॅमेऱ्यात किंवा मोबाईलमध्ये कैद करण्याचा प्रयत्न केला तर त्याच ठिकाणी त्याचा हात पकडला जातो. मात्र परदेशातून आलेली मंडळी त्यांना वाट्टेल त्या स्थळाची बिनधास्तपणे व्हिडिओ शूटिंग करून नेतात, तेव्हा त्यांना कोणीच आडवा हात करीत नाहीत अशी आपली रीत आहे. 'चोर सोडून संन्याशाला फाशी' देण्याची पद्धत तशी आपल्याकडे इतिहासकाळापासून चालत आलेली आहे. त्याची प्रचिती या घटनेनिमित्त पुन्हा एकदा आली.

मुंबईवरील तीन दिवसांच्या हल्ल्यात ओबेरॉय हॉटेल, बगदादी हॉटेल, नरिमन पॉईंटजवळील कॅफे लिओफोल्ड, हॉटेल ताज, छत्रपती शिवाजी टर्मिनस व कामा इस्पितळाचे किती नुकसान झाले, परिणामी उद्योग जगताला किती आर्थिक फटका बसला व दैनंदिन समाजजीवनावर कोणते विपरीत परिणाम झाले

याची गोळाबेरीज करण्यापेक्षा हल्ल्यादरम्यान किती निरपराध लोक मारले गेले व पोलीस दलासह राष्ट्रीय सुरक्षा दलाचे किती जवान शहीद झाले हे दु:ख अधिक गहिरे असून, ती जखम न भरणारी आहे. 'मरेपर्यंत मारत रहा' असे ज्यांच्या मिशनचे घोषवाक्य होते ते अतिरेकी मुंबईकरांसाठी अत्यंत नियोजनबद्ध घातक खेळ खेळत होते. दुसऱ्या बाजूने ओलिस ठेवलेल्या निष्पाप लोकांची सुरक्षित सुटका करण्यासाठी जिवावर उदार होऊन पोलीस दलाचे कर्मचारी, अधिकारी व लष्कराचे जवान अतिरेक्यांशी निकराची झुंज देत होते. मारणाऱ्यांविरुद्ध वाचविण्याऱ्यांचा तो लढा सुमारे ५९ तास अखंडपणे सुरू होता.

पाकिस्तानात प्रशिक्षण घेऊन अतिरेकी सागरी मार्गाने मुंबईत येतात. समुद्रालगत असलेल्या हॉटेलमध्ये मुक्कामी राहतात तरी त्याची कानोकान माहिती पोलीस यंत्रणेला लागू नये यापेक्षा दुर्दैव दुसरे कोणते असू शकते? मुंबई ही महाराष्ट्राची केवळ राजधानीच नसून देशाच्या आर्थिक उलाढालीचा तो महत्त्वाचा कणा आहे. हा कणा जर इतका गुळगुळीत राहणार असेल तर उद्या माणसांचे मरण याहून स्वस्त झाल्याशिवाय राहणार नाही, हे नोव्हेंबर २००८ मध्ये घडलेल्या घटनेतून पुन्हा एकवार सिद्ध झाले आहे. खरे तर सागरी मार्ग फार महत्त्वाचा मानला जातो. तो जितका फायदेशीर तितकाच धोकेदायकही ठरू शकतो हे साऱ्यांनाच कळते; मात्र संरक्षणाच्या दृष्टीने त्याचे गांभीर्य पाळले जात नाही. या हल्ल्यात शहीद झालेल्या दहशतवादविरोधी पथकाचे प्रमुख हेमंत करकरे यांनी सागरी मार्गांवर पोलीस स्टेशन व ठिकठिकाणी चौक्या उभारण्याचा प्रस्ताव घटनेच्या दोन वर्ष आधी दिलेला होता. त्यांनी दिलेला प्रत्येक प्रस्ताव अभ्यासपूर्ण असायचा. त्यामागे एखादा विशिष्ट अर्थ दडलेला असायचा. त्यांनी आजतागायत दिलेले जवळपास सर्वच प्रस्ताव स्वीकारले गेले व काही कार्यान्वितही झाले. मात्र पोलीस चौक्यांचा प्रस्तावच धूळ खात का पडून राहिला हेदेखील एक न उलगडणारे कोडे आहे. सागरी किनारपट्ट्यांसोबतच मुंबईतील महत्त्वाच्या ठिकाणांनाही जपणे व त्याठिकाणीही सुरक्षेच्या दृष्टीने अधिक सजग राहणे महत्त्वाचे आहे. हॉटेल ताज फक्त एक वास्तू इतकीच तिची ओळख राहिलेली नाही. ती मुंबईची शान बनलेली आहे. त्याठिकाणी मुक्कामाला उतरणे हेदेखील देश-विदेशातील उच्चभ्रू लोकांसाठी अतिशय प्रतिष्ठेचे मानले जाते. त्यामुळे हॉटेल ताजच्या प्रशासनानेसुद्धा जागरूक राहणे गरजेचे होते. आपल्या हॉटेलमध्ये कोण वास्तव्याला येतो, तो कोठून आलेला आहे, त्या व्यक्तीच्या हालचाली कशा आहेत, तो काय करतो अशा बारीकसारीक गोष्टींवर नजर ठेवली असती तर धोका टाळता आला असता. आतापर्यंत त्यांनी एवढी सजगता पाळली नसेल किमान यापुढे तरी या घटनेतून बोध घेणे हितावह ठरणार आहे.

मुंबईवर झालेल्या हल्ल्यात सर्वात मोठी उणीव दिसून आली ती म्हणजे आपल्या पोलिसांकडे असलेले तोकडे हत्यार. विविध योजनांच्या नावाखाली तसेच मंत्र्यांच्या निरर्थक दौऱ्याच्या निमित्ताने लाखो रुपये एकीकडे पाण्यासारखे

खर्च केले जात असतांना जनतेचा जो रक्षक मानला जातो, त्या रक्षकाला तरी सुसज्ज व अत्याधुनिक शस्त्रे पुरविणे ही काळाची गरज बनलेली आहे. कसाब आणि त्याचे साथीदार अत्याधुनिक व स्वयंचलित अशा एके–४७ व एके–५६ सारखी आयुधे घेऊन मुंबईच्या मानगुटीवर बसली होती. त्यांच्यासमोर मुंबई पोलिसांकडील इतिहास जमा झालेली थ्री नॉड थ्रीची रायफल कोठे नास्त्याला पुरणार होती? सीएसटीवर अजमल कसाब आणि इस्माईल खानने अत्याधुनिक शस्त्राच्या बळावर जो नंगानाच केला, त्याला प्रत्युत्तर देणाऱ्या आपल्या काही पोलीस कर्मचाऱ्यांच्या रायफली फैरी झाडतांना मध्येच अडकून पडत होत्या. काहींची अतिरेक्यांपर्यंत रेंज पोहोचत नव्हती. सीएसटीकडून रंगभवनकडे जाणाऱ्या हेमंत करकरे, अशोक कामटे व विजय साळसकर यांच्याकडेदेखील अत्याधुनिक हत्यारांची वानवाच होती. त्यामुळे त्यांना खिंडीत पकडून अतिरेक्यांनी त्यांच्यावर आपल्याकडील अत्याधुनिक व स्वयंचलित अशा एके–४७ व एके–५६ने गोळ्यांची बरसात केली, त्यामुळे त्यांना फारसा प्रतिकार करण्याची संधीही मिळाली नाही. या तिघांकडे स्वयंचलित बंदुका असत्या तर अजमल कसाब व इस्माईल खान केवळ जखमी झाले नसते, तर त्याचठिकाणी त्यांना आपल्या शूरवीरांनी अस्मान दाखविले असते. मुंबई पोलिसांकडील साध्या रायफली काय असतात आणि राष्ट्रीय सुरक्षा दलाच्या कमांडोंकडे असलेल्या अत्याधुनिक बंदुका कशा असतात, याची प्रचिती या हल्ल्याच्या निमित्ताने आली आहे. अत्याधुनिक बंदुका कमांडोंकडे होत्या म्हणून ठार झालेल्यांमधील अधिकाधिक अतिरेक्यांचा वेध कमांडोंनीच घेतला आहे. या घटनेतून शहाणे होऊन आता तरी पोलिसांकडील शस्त्रे बदलण्याची वेळ आलेली आहे. हल्ल्यानंतर सावरलेल्या मुंबईतील काही महत्त्वाच्या ठिकाणी पोलिसांनी जो पहारा लावला होता. तोदेखील हास्यास्पद प्रकारचाच होता. हॉटेल ताजवर हल्ला झाल्यानंतर सुमारे शंभर पोलिसांचा बंदोबस्त त्याठिकाणी काही कालावधीसाठी लावण्यात आला होता. मात्र ताजची राखण करण्यासाठी कार्यरत असलेल्या पोलिसांकडे बंदुकांऐवजी लाठ्या होत्या. इतक्या ढिसाळपणे वागून जर आपल्या कोलमडलेल्या सुरक्षा यंत्रणेचे दर्शन घडविणार असू तर बाकीचे न बोललेलेच बरे.

अतिरेक्यांच्या हल्ल्याने लागलेल्या आगीत मुंबई होरपळत असतांना तमाम नागरिकांना सर्वाधिक जर काही खटकले असेल तर तो म्हणजे वृत्तवाहिन्यांचा आततायीपणा ! आजपर्यंत नुसते असे म्हटले जायचे की वृत्तवाहिन्यांमध्ये जीवघेणी स्पर्धा सुरू आहे. मात्र लोकांनी ऐकलेले वाक्य मुंबईवर झालेल्या घटनेनंतर प्रत्यक्षात प्रत्ययास आले. मुंबईवर हल्ला झाल्यानंतर हल्ला करणारे अतिरेकी दाखवा, काय नुकसान झाले ते दाखवा, ती घटना म्हणजे क्रिकेटचा सामना नव्हता. त्याचे थेट प्रक्षेपण करून या वृत्तवाहिन्यांनी कोठे बंदोबस्त सुरू आहे, कोणकोणत्या स्पॉटवर कोण खिंड लढवित आहे, संभाव्य धोके

टाळण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून काय उपाययोजना केल्या जात आहेत, अतिरेक्यांना रोखण्यासाठी कमांडोंना कसे पाचारण केले जात आहे, कोणता अधिकारी केव्हा आला, त्याने हेल्मेट केव्हा घातली, बुलेटप्रूफ जॅकेट केव्हा परिधान केले याची तपशीलवार माहिती देऊन या वृत्तवाहिन्यांना नेमकी कोणाची शाबासकी मिळवायची होती? त्यांचे प्रक्षेपण केवळ महाराष्ट्रातील प्रेक्षकच बघतील असे तर काही घडणार नव्हते. त्यांचे प्रक्षेपण मुंबईसह सर्व जगभर पाहिले जाणार होते. ताज व ओबेरॉय हॉटेल हल्ल्याचे अड्डे बनवून त्यात दडून बसलेल्या अतिरेक्यांनीसुद्धा सॅटेलाईट मोबाईलवरून त्याचे प्रक्षेपण पाहिले असेल. पाकिस्तानमध्ये बसून हल्ल्याचे सूत्रे हलविणाऱ्या अतिरेक्यांच्या म्होरक्यांनीही ते पाहिले असेल. ते प्रक्षेपण पाहून त्यांना नियोजनाची दिशा ठरविता आली असेल. म्हणून वृत्तवाहिन्यांमुळेच मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे जे बोलले जाते, त्यात तथ्य वाटू लागते. स्पर्धा जरुर असावी; मात्र ती कोणासाठी जीवघेणी ठरणारी असता कामा नये. आपल्या देशाची गुपिते आपण जपायलाच हवीत. केवळ टीआरपी वाढविण्यासाठी किरकोळ गोष्टींचा चोथा होईपर्यंत तिला चघळत राहणे हे शहाणपणाचे लक्षण तर निश्चितच नाही.

या दुर्घटनेत शहीद झालेल्या शूरवीरांना शौर्य पुरस्कार देतांनाही शासनाने आपल्या कफल्लक वृत्तीचे दर्शन घडविले आहे. राजा असो की रंक, जीवन साऱ्यांनाच प्रिय वाटत आले आहे. एकीकडे 'या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे' असे म्हटले जात असताना व दुसरीकडे मुंबईवर अकस्मात झालेल्या हल्ल्यात मृत्यू डोळ्यासमोर चक्क तांडवनृत्य करीत असताना निधड्या छातीने अतिरेक्यांचा प्रतिकार करत लढत लढतच हल्ल्याच्या होमकुंडात आयुष्याच्या समीधा ओवाळून टाकणाऱ्या शहिदांच्या वीरमरणात शौर्य नव्हते काय, असा सवाल अशोकचक्र अथवा तत्सम सन्मानापासून वंचित राहिलेल्या अकरा शहीद कुटुंबीयांनी उद्या मूकपणे विचारला तर नवल वाटू नये.

मुंबईवर झालेल्या अतिरेकी हल्ल्यात अठरा जणांना वीरमरण आले. त्यातील दहशतवादविरोधी पथकाचे प्रमुख हेमंत करकरे, खंडणीविरोधी पथकाचे प्रमुख विजय साळसकर, अतिरिक्त पोलीस आयुक्त अशोक कामटे, राष्ट्रीय सुरक्षा दलाचे मेजर संदीप उन्नीकृष्णन्, कमांडो गजेंद्रसिंग बिश्त व सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक तुकाराम ओंबळे या सहा जणांना गणराज्यदिनी मरणोपरान्त अशोकचक्र व वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशांक शिंदे यांना कीर्तिचक्राने सन्मानित करण्यात आले. वास्तविक शशांक शिंदे यांना कीर्तिचक्र स्वतःहून देण्यात आलेले नाही. अशोकचक्राच्या संभाव्य नावांच्या यादीतून जेव्हा सीएसटीवर सर्वप्रथम शहीद झालेल्या शिंदे यांचे नाव मागे पडले, त्यांच्या बलिदानाची अपेक्षेप्रमाणे दखल घेतली गेली नाही त्यामुळे व्यथित झालेल्या शिंदे यांच्या कुटुंबीयांनी नाराजी व्यक्त केली. त्यानंतर कीर्तिचक्र त्यांच्या वाट्याला आले. मुंबईवरील हल्ल्यातील सहा जणांचा अशोकचक्रासाठी विचार केला गेला ही सर्वांसाठी

निश्चितच समाधानाची आणि भूषणावह बाब आहे. मात्र या सात जणांच्याच खांद्याला खांदा लावून वेगवेगळ्या आघाड्यांवर अत्याधुनिक शस्त्रानिशी सज्ज असलेल्या अतिरेक्यांशी जीवन–मरणाचा खेळ खेळता खेळता जे धारातीर्थी पडले, त्या उर्वरित अकरा शूरवीरांचे काय? त्यांचे बलिदान शौर्याच्या चौकटीत बसत नव्हते काय? आर्थिक व अन्य स्वरूपाच्या कोणत्याही मदतीतून जगणे तर विकत घेता येऊ शकते; मात्र जीवन नाही हे लक्षात घेऊन अशोकचक्र, कीर्तिचक्र अथवा तत्सम शौर्य पुरस्कार देऊन त्यांच्याही हौतात्म्याला वंदन करता आले नसते का? त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खावर शाबासकीची फुंकर घालता आली नसती का, असे एक ना अनेक सवाल या 'अशोकचक्र' प्रकरणाच्या निमित्ताने देशवासीयांच्या मनात उपस्थित झाल्यावाचून राहणार नाहीत.

देशासाठी बलिदान देणाऱ्यांच्या वीरमरणाला केवळ शहीद ही उपाधी पुरेशी ठरते. यात सर्व काही येऊन जाते. तो दहशतवादविरोधी पथकाचा प्रमुख आहे, की सायन कोळीवाड्यातील झोपडपट्टीत राहणारा एखादा होमगार्ड आहे हे महत्त्वाचे नसते. साधा सैनिक आहे की एखादा ज्येष्ठ अधिकारी आहे अशा कोणत्याही फूटपट्टीने बलिदानानंतर त्यांच्या त्यागाचे मोजमाप करता येत नाही. अन् ते कोणी करण्याचा प्रयत्नही करू नये. सर्वच शहिदांना अशोकचक्राने सन्मानित करण्यात यावे, अशीच शिफारस प्रारंभी पोलीस प्रशासनाकडून करण्यात आली असताना 'त्या' अकरा जणांना डावलून खुद्द निवड समितीने एका नव्या वादाला तोंड फोडले आहे.

छत्रपती शिवाजी टर्मिनसवर इस्माईल खान आणि अजमल कसाबने केलेल्या अंदाधुंद गोळीबारात ५२ निरपराध लोकांना आपल्या प्राणाला मुकावे लागले. त्याप्रसंगी मरणाच्या भीतीने रेल्वेस्थानकावर सैरावैरा धावणाऱ्या प्रवाशांना सुरक्षितस्थळी हलविण्यासाठी जिवाची बाजी लावणाऱ्या रेल्वे पोलीस दलाचे हवालदार मुरलीधर चौधरी, गृहरक्षक दलाचे मुकेश जाधव व ड्यूटी संपलेली असतानाही गोळीबाराच्या आवाजामुळे धावून माघारी परतणाऱ्या अंबादास पवार यांनी जिवावर उदार होऊन दाखविलेले धाडस शौर्याच्या चौकटीत बसत नाही? कामा इस्पितळात दडून बसलेल्या अतिरेक्यांच्या एके–४७ आणि ग्रेनेडच्या माऱ्याशी धैर्याने लढणाऱ्या वायरलेस ऑपरेटर विजय खांडेकर आणि पोलीस उपनिरीक्षक प्रकाश मोरे यांच्या बलिदानात शौर्य नव्हते? दिवसपाळीची ड्यूटी संपवून घरी गेलेल्या व हल्ला झाल्याचा सांगावा जाताच पुन्हा अंगावर वर्दी चढवून कामालेनमध्ये अतिरेक्यांच्या हल्ल्यात धारातीर्थी पडण्यात बापूराव धुरगुडे यांचे शौर्य नव्हते? रंगभवनजवळ तळहातावर प्राण घेऊन सशस्त्र अतिरेक्यांना टिपण्याच्या इराद्याने निघालेल्या करकरे, कामटे व साळसकर यांच्यासोबतच वीरमरण आलेल्या बळवंत भोसले, जयवंत पाटील व योगेश पाटील यांचे शौर्य नव्हते काय? पोलिसांचे वाहन घेऊन डोक्यात सैतान

संचारल्यागत दिसेल त्या रस्त्याने पळत सुटलेल्या अतिरेक्यांना टिपण्याच्या नादात मेट्रो जंक्शनजवळ शहीद होण्यात अरुण चित्ते यांचे धाडस नव्हते काय? असे प्रश्न उद्या सर्वत्र उपस्थित होतील, तेव्हा त्याचे उत्तर कोणाकोणाला द्याल? आणि त्या उत्तरातून जनतेचे समाधान होईल की नाही हासुद्धा एक अनुत्तरीतच प्रश्न आहे.

एकट्या मुंबईच्याच नव्हे तर अवघ्या देशाच्या इतिहासात काळ्या अक्षराने कोरल्या गेलेल्या या दुर्घटनेला आज एक वर्षाचा काळ लोटला मात्र आजही ती घटना त्यांच्या कुटुंबीयांसाठी नुकतीच घडल्यासारखी वाटत असून, त्या शहीद कुटुंबीयांच्या अंतर्मनाला झालेल्या जखमांचे व्रण आजही ताजेच आहेत. त्या जखमा तर कधीही न भरून निघण्यासारख्याच आहेत. तरीदेखील प्रजासत्ताकदिनाच्या निमित्ताने शहिदांना मानाच्या समजल्या जाणाऱ्या एखाद्या शौर्य किताबाने गौरविले गेले असते तर काय बिघडले असते? प्रजासत्ताकदिनानंतर शहिदांना त्यांच्या शौर्याविषयी किताब जाहीर झाले, मात्र तोपर्यंत त्या किताबांची खरी हवा निघून गेलेली होती. शासनाला उशिरा सुचलेले ते शहाणपण होते.

मुंबईवर झालेल्या घटनेचा घटनाक्रम आतापर्यंत वाचकांसमोर आलेला आहे. हल्ल्यामुळे किती नुकसान झाले, किती लोक मृत्युमुखी पडले, किती जणांना वीरमरण आले हेदेखील टप्प्याटप्प्याने वाचकांसमोर आले. मात्र या सर्व प्रकरणात एकवाक्यता कोठे दिसून आली नाही. हेमंत करकरे, अशोक कामटे, विजय साळसकर हे दिग्गज अधिकारी सुरुवातीपासूनच सोबत होते. अरुण चित्ते साळसकरांचे वाहनचालक असल्याने तेसुद्धा त्यांच्यासोबतच शहीद झाले. सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बापूराव धुरगुडे कामा इस्पितळात अतिरेक्यांशी लढतांना शहीद झाले यासह विविध गोष्टींबाबत सरमिसळ झाल्याने या घटनाक्रमाविषयी व वीरमरण आलेले हुतात्मे नेमक्या कोणत्या स्पॉटवर शहीद झाले याविषयी जाणून घेण्यासाठी लोकांमध्ये आजही उत्सुकता आहे. अशाच उत्सुकतेच्या भावनेतून माझे वडील आदरणीय श्री. रामदास वाघ यांनी या विषयावर मी पुस्तक लिहावे, असा प्रस्ताव माझ्यासमोर मांडला. त्यांनी मांडलेला प्रस्ताव एक आव्हान म्हणून स्वीकारल्यावर मी कामाला लागलो. एक पत्रकार म्हणून बहुतांशी माहिती माझ्याकडे होतीच. मात्र माझ्या दृष्टीने ती पुरेशी नव्हती. ती फारच त्रोटक व मनामध्ये संदिग्धता निर्माण करणारी होती. ती सविस्तर माहिती जाणून घ्यावी, घटनाक्रम समजून घ्यावा यासाठी पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांची व शहीद झालेल्या वीरजवानांच्या कुटुंबीयांची प्रत्यक्ष भेट घेणे गरजेचे होते. ती गरज पूर्ण करण्यासाठी मी तडक मुंबई गाठली. योगायोग असा की शहीद मेजर संदीप उन्नीकृष्णन, कमांडो गजेंद्रसिंग बिश्त, सुलतानपूर (जि. सोलापूर) येथील राहुल शिंदे व कवठे (ता. वाई) येथील अंबादास पवार यांचा अपवाद सोडला तर सर्व शहिदांचे कुटुंबीय मुंबईत स्थायिक आहेत. त्यामुळे त्या

सर्वांची एकाच शहरात भेट घेणे मला सोयीचे झाले. मुंबईविषयी बऱ्यापैकी माहिती मला होती. अगदी नवखा होतो, अशातलाही भाग नाही. सर्वात आधी महत्त्वाचे काम केले ते शहिदांच्या कुटुंबीयांचे पत्ते मिळविण्याचे. त्यानंतर त्यांचे निवासस्थान गाठणे सोयीचे जाणार होते. शहीद कुटुंबीयांचे पत्ते मिळविणे व त्यांच्या निवासस्थानापर्यंत विनाविलंब पोहोचण्याच्या कामी मला मोलाची मदत झाली ती मुंबई पोलीस म्हणून कार्यरत असलेल्या माझ्या मामाची (श्री. सी. आर. सूर्यवंशी यांची). रात्रपाळीची ड्यूटी संपवून व रात्री बारा तासांचे जागरण सहन करून तो माणूस दिवसभर माझ्यासोबत फिरायचा. त्यामुळेच त्यांचा नामोल्लेख जर याठिकाणी केला नाही तर ते कृतघ्नपणाचे ठरू शकेल.

काही अपवाद सोडल्यास सर्व शहिदांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. आस्थेने चौकशी केली. शहीद झालेल्या जवानांची, पोलीस कर्मचाऱ्यांची व पोलीस अधिकाऱ्यांची सुरुवातीपासून तर आतापर्यंतच्या प्रवासाची माहिती संकलित केली. शहिदांच्या जडण–घडणीची, त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यांची, त्यांच्या शैक्षणिक प्रवासाची, त्याच्या आवडी–निवडीची, त्यांच्या कौटुंबिक परिस्थितीची इत्थंभूत माहिती घेतली. प्रत्येक शहीद जवान घरातून केव्हा निघाले, ड्यूटीवर निघण्यापूर्वी त्यांनी उद्याचे काही नियोजन केले होते का, घरातून निघण्याआधीच्या एक–दोन दिवसापूर्वी त्यांचे वागणे कसे होते, त्यांनी काही खरेदी केली होती का, कुटुंबीयांना काही सूचना केल्या होत्या का यासह शहीद होण्यापूर्वी त्यांचे अखेरचे बोलणे कोणाशी व काय झाले होते याचा सर्व तपशील गोळा केला. शहीद कुटुंबीयांशी संवाद साधतांना बरीचशी महत्त्वाची माहिती हाती लागली. काही गोष्टी ऐकून स्वत: अस्वस्थ झालो. त्याचक्षणी वाटले की माझ्या हाती लागलेला हा जो काही ऐवज आहे, तो वाचकांपर्यंत पोहोचला पाहिजे. नुसते शहीद झाले म्हणून त्यांची फाईल 'नव्याचे नऊ दिवस' या उक्तीप्रमाणे नंतर ती कायमस्वरूपी बंद करून त्यांना विस्मरणाच्या गर्तेत लोटणे योग्य नाही. मुंबईच्या रक्षणासाठी लढता–लढता बलिदानाच्या वेदीवर चढून गेलेल्या त्या अमर हुतात्म्यांचा एकूणच प्रवास कोठेतरी कायमस्वरूपी शब्दबद्ध व्हावा, तो जपला जावा व देशभक्तीच्या ध्येयाने पछाडलेली ही माणसे नेमकी कोण होती, त्यांचा अभिमानास्पद इतिहास लोकांपर्यंत पोहोचावा, हाच या पुस्तक लेखनामागचा मुख्य हेतू आहे.

मुंबईवर २६/११ रोजी झालेल्या हल्ल्याविषयीची अथपासून इतिपर्यंत वास्तव माहिती केवळ मला एकट्यालाच ठाऊक आहे, अशा खोट्या अविर्भावात मी वावरत नसून तसा माझा दावादेखील नाही. शहिदांसंदर्भात आजपर्यंत वाचकांसमोर न आलेल्या गोष्टी व हल्ल्यासंदर्भात आपल्यासमोर आलेल्या माहितीतील उणिवांबाबत खुद्द शहिदांच्या कुटुंबीयांशी बोलतांना हाताशी लागलेले मुद्दे व शहीद जवानांच्या जडणघडणीसह त्यांची कौटुंबिक माहिती वाचकांपर्यंत पोहोचावी हीच प्रांजळ भूमिका या लेखनामागची आहे. माझे असे स्वत:चे यांत

काहीही नाही. मी फक्त एक संदेशवाहकाचे काम याठिकाणी केलेले आहे एवढेच.

मुंबईवर झालेला अतिरेकी हल्ला, त्याचा कट कसा शिजला, संरक्षण विभागाच्या उणिवा, आपण कोठे कमी पडलो, हल्ल्यानंतर मदतकार्यात सहभागी झालेले सहृदयी, हल्ल्यामुळे झालेले नुकसान, हल्ल्यानंतर उमटलेले पडसाद, केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील, मुख्यमंत्री विलासराव देशमुख, उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांच्या पदांवर आलेले गंडांतर, हल्ल्यात दिलेल्या न दिलेल्या योगदानाबद्दल श्रेय लाटण्यासाठी झालेली चढाओढ, विविध पुरावे सादर करूनही हल्ल्याची जबाबदारी न स्वीकारण्याचा पाकिस्तानचा नेहमीचा शिरस्ता, टाळूवरचे लोणी खाण्यासाठी राजकीय पक्षांमधील चढाओढ, हल्ल्यानंतर वेगवेगळ्या उपाययोजना करण्याच्या घोषणांसह कसाबसाठी बनविण्यात आलेले अडीच कोटीचे स्पेशल कोर्ट, वेगवेगळ्या आघाड्यांवर खिंड लढविणारे पोलीस अधिकारी, कर्मचारी, गृहरक्षक दलाचे कर्मचारी, केंद्र तसेच राज्य राखीव दलाचे जवान व राष्ट्रीय सुरक्षा रक्षक दलाच्या जवानांचा चित्तथरारक अनुभव, अग्नीशमन दलाने केलेली प्रयत्नांची पराकाष्टा, विविध रुग्णालयातील यंत्रवत राबणाऱ्या डॉक्टर्स, परिचारिका व कर्मचाऱ्यांची अखंड रुग्णसेवा, मदतकार्यात सक्रिय झालेल्या सामाजिक व सेवाभावी संस्थांची धावपळ, शासकीय अधिकारी व लोकप्रतिनिधींचा प्रत्यक्ष सहभाग तसेच प्रचंड हानी होऊनही मुंबईकरांनी दाखविलेली सहनशीलता व 'मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा' ही काव्यउक्ती डोळ्यासमोर ठेवून पुन्हा राखेतून उठून आपापल्या क्षेत्राच्या अवकाशात फिनिक्ससारखी झेप घेण्यासाठी दाखविलेली सज्ञता यासह विविध मुद्द्यांना स्पर्श करणारे एक स्वतंत्र पुस्तक होऊ शकते. यथावकाश हाही विषय कोणीतरी हाताळेलच. परंतु '२६/११चे अमर हुतात्मे' या पुस्तकाचा मुख्य आत्मा केवळ शहीद हेच असून, तेवढ्यापुरताच त्याचा परीघ मुद्दाम ठेवलेला आहे. शहिदांचा पूर्वेतिहास घेऊन वाचकांसमोर येण्यास या पुस्तकाला म्हटले तर तसा विलंब झाला आहे. मात्र शहीद कुटुंबीयांच्या नजरेतून विचार केल्यास हा विषय आजही त्यांच्या जखमा जितक्या ताज्या आहेत तितकाच हा विषयदेखील ताजाच राहणार आहे. देशासाठी आपले प्राण पणाला लावून केलेल्या बलिदानाची गाथा कधीच शिळी होत नसते ती एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे सदैव दिशादर्शक आणि प्रेरणादायीच राहते. यासंदर्भात घटनेला एक महिना होण्याच्या पूर्वसंध्येला शहीद साळसकर यांच्या वीरपत्नी स्मिताताई साळसकर यांच्याशी बोलण्याच्या ओघात मी त्यांना म्हटले, 'ताई दुर्घटनेला उद्या एक महिना पूर्ण होत आहे तर आपल्या भावना आज काय आहेत.' त्यावर त्या म्हणाल्या, लोकांच्या दृष्टीने या घटनेला महिना उलटला असून, मला तर ही घटना कालच घडल्यासारखी वाटत आहे. स्मितातार्इंच्या नजरेतून या घटनेकडे पाहिल्यास आज तशा अर्थाने फक्त बारा दिवसच उलटल्याइतकी ही घटना ताजी आहे. शहीद ओंबळेंच्या अजोड कामगिरीमुळे भारताच्या हाताशी लागलेला

क्रूरकर्मा कसाबला जोपर्यंत शिक्षा होत नाही, तोपर्यंत ही घटना ताजीच राहील यात शंका नाही.

पुस्तक लेखनामागची प्रेरणा वडिलांची असली तरी ते मार्गी लागण्यासाठी जिने माझ्यामागे सारखा तगादा लावला, पिच्छा पुरवला त्या माझ्या आईचे आभार मानणे तिलाच आवडणार नाही. एकेका शहिदांवरचे भाग लिहून पूर्ण झाल्यावर ते बारकाईने वाचणे, प्रसंगी लिखाणाची दिशा देणारे व मुद्रिते स्वत:च तपासणाऱ्या वडिलांचे आभार कोणत्या शब्दात मानू? अल्पावधीतच पुस्तकाला साजेशी व समर्पक अशी प्रस्तावना लिहून देणारे प्रख्यात समीक्षक, ज्येष्ठ साहित्यिक, प्रभावी वक्ता व पुणे येथील विद्यापीठ कक्षेतील प्राचार्य डॉ. श्रीपाल सबनीस यांचे आभार मानणे त्यांनादेखील रुचणार नाही, यासाठी मी सदैव त्यांच्या ऋणातच राहणे पसंत करेन. कोणतेही आढेवेढे न घेता उलट पुस्तकाविषयी आपुलकीच्या भावनेतून चौकशी करून आत्मीय आनंदच व्यक्त करणाऱ्या सबनीससरांच्या प्रस्तावनेने पुस्तकाच्या अक्षरसौंदर्यात एकार्थाने भरच पडली आहे. अक्षरजुळणी व मांडणी करणारे विजय चौधरी, सजावट करणारे सुभाष महाले, योगेश फेगडे, योगेश पाटील, समाधान राऊत व संजय देवघरे, पुस्तकाची सुबक छपाई करून देणारे त्रिमूर्ती फाईन आर्ट प्रा. लि. चे संचालक व कर्मचारी तसेच कलात्मक आणि देखणे मुखपृष्ठ साकारणारे नंदू गवांदे यांच्यासह ज्या ज्ञात-अज्ञात दोस्तांचे कळत नकळत हातभार लागलेत त्या साऱ्यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत. ज्या संस्थेत माझी जडणघडण झाली त्या 'लोकमत' विषयीचा कृतज्ञताभाव माझ्या मनात कायम घर करून राहील, ते ऋण शब्दातीत आहेत.

मुंबईवरील अतिरेक्यांचा भ्याड हल्ला परतावून लावताना हौतात्म्य पत्करलेल्या त्या अमर हुतात्म्यांच्या बलिदानाची ही शौर्यगाथा समाजातील अनिष्ट व्यवस्थेविरुद्ध लढणाऱ्यांना बळ देणारी ठरो, देशाप्रती अभिमानाची भावना ज्यांच्या मनात आजही ठासून भरलेली आहे, त्या संवेदनशील माणसांच्या संवेदना बोथट न होऊ देण्यासाठी प्रेरणादायी ठरो तसेच खाकी वर्दीला मान-सन्मान व प्रतिष्ठा प्राप्त करून देणाऱ्या त्या कर्तृत्ववान सुपुत्रांचा आदर्श अवघ्या पोलीस दलाचे मनोबल उंचावणारा ठरो, हीच अपेक्षा !

**- संजय वाघ**

२, सागर रो-हाऊसेस,
दत्तधाम चौक, पाटीलनगर,
सिडको, नाशिक-४२२००९
भ्रमणध्वनी : ९९२२९०४०७२

# प्रस्तावना

**शहिदांच्या** हौतात्म्याचे मूल्य संस्कृतीच्या अजेंड्यावर सतत श्रेष्ठ ठरत असले तरी रक्ताची तहान कधी संपणार? माणसांचे रक्त सांडण्याची अपरिहार्यता विश्वाच्या इतिहासात केव्हा संपुष्टात येईल? या सनातन प्रश्नांची उत्तरे आंतरराष्ट्रीय राजकारण्यांसह कोणताही विचारवंत देऊ शकलेला नाही. ही कुरूप वास्तवताच संस्कृतीच्या विकासाचा डंका फोल ठरविते.

देशांच्या सीमांनी बंद आणि बद्ध असणारे देशांचे भौगोलिक नकाशे धर्म–जाती–वंशाच्या जहरी वास्तवाने सतत थरथरत असतात. अर्थात धर्माच्या इतिहासाचे वर्तमान संदर्भ आंतरराष्ट्रीय भूगोलाचा नकाशा टराटरा फाडण्यासाठी कृतिशील आहेत. म्हणूनच विश्वमानवाची विश्वसंस्कृती आणि विश्वशांतीच्या जागतिक ध्येयवादाला कायमचे आव्हान धर्मांध मूलतत्त्व–वाद्यांकडून दिले जात आहे.

देशभक्तांचा मृत्यू आणि अतिरेक्यांचा मृत्यू ही दोन्ही मरणे हाडामासाच्या माणसांचीच असली तरी संस्कृतीचे पाईक देशभक्तांच्या हौतात्म्याला वंदनीय का मानतात? अतिरेक्यांचा मृत्यू गौरवास्पद का मानला जात नाही? देशांच्या व धर्माच्या सीमारेषा ओलांडल्या की संदर्भ बदलतो आणि अतिरेकी देशभक्त ठरतो व देशभक्त दुसऱ्या देशाच्या नजरेत अतिरेकी दुश्मन समजला जातो. तेव्हा शहिदांच्या अमरत्वाचे विविध संदर्भ लक्षात घेऊनच व्यापक परिप्रेक्षात मृत्यूचे मूल्य संस्कृतीच्या प्रवाहात अधोरेखित होत असते.

विश्वाच्या नकाशात भारत हा तुमचा–माझा देश असल्याने या देशाची माती व माणसे सांस्कृतिक अनुबंधाने आपणाशी जुळलेली आहेत. त्यातूनच देशभक्ती, राष्ट्रनिष्ठा, देशप्रेम या मूल्यांची निर्मिती झालीय. अर्थात आधुनिक काळातही विश्वमानवतेचा ध्येयवाद अधोरेखित करताना देशभक्तीचे मूल्य संशयास्पद ठरू शकत नाही. भारताचा राष्ट्रवाद हा विश्वात्मकतेच्या मूल्य विचारांशी पूर्णत: सुसंवादी राहिल्याचा इतिहास आहे. म्हणूनच राष्ट्रवादी भूमिका घेऊन प्राण पणाला लावणाऱ्या हुतात्म्यांचे स्मरण प्रत्येक पिढीला सर्वार्थाने प्रेरक ठरते.

ही व्यापक सांस्कृतिक, ऐतिहासिक व तत्त्वज्ञानात्मक पार्श्वभूमी लक्षात घेतल्यावर पत्रकार संजय रामदास वाघ यांच्या '२६/११चे अमर हुतात्मे' या ग्रंथाचे महत्त्व आपोआपच सिद्ध होते. २६/११ हे आकडे महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण भारताला वेदना देणाऱ्या काळ्या इतिहासाचे दु:खद शब्द आहेत. अठरा शहिदांचे बलिदान या दिवशी अमर झाले. हजारो निष्पाप जनता दु:ख–

वेदनेच्या जखमा घेऊन या इतिहासाचा अविभाज्य भाग बनली. मुंबई हादरली, महाराष्ट्र भयभीत झाला, देश बावरला. विश्व अचंबित झाले.

२६/११चा मुंबईवरील अतिरेक्यांचा हल्ला हा राजकारण, अर्थकारण, लष्करी क्षेत्र, विश्वाची दार्शनिकता, धर्मसंवाद- धर्म संघर्ष, विश्वशांती, अहिंसा, परिवर्तन इत्यादी अनेक संदर्भातील ऐतिहासिक प्रवाह व परंपरा यांना अंतर्मुख करायला भाग पाडणारी विश्वात्मक घटना आहे.

संजय वाघ हे कुशल व अनुभवी पत्रकार आहेत. 'लोकमत'सारख्या प्रसिद्ध व लोकाभिमुख दैनिकाच्या दैनंदिन कामात निष्ठेने कार्यरत असणाऱ्या या संवेदनशील पत्रकाराची निरीक्षणशक्ती या पुस्तकाच्या पानापानावर प्रतिबिंबीत झालीय. घटनेचे रूक्ष तपशील देण्यात संजय वाघ यांच्या लेखणीला फारसे स्वारस्य नाहीच ! देशाच्या स्वातंत्र्याचे व सार्वभौमत्त्वाचे रक्षण करणाऱ्या अठरा हुतात्म्यांच्या देशभक्तीचे रंग-रूप आणि शौर्याची गाथा टिपण्यात श्री. वाघ यांना अधिक रस आहे. म्हणूनच प्रत्येक शहिदांच्या जीवनकहाणीत हा तरुण पत्रकार आत्मीयतेने बुडी मारतो. हेमंत करकरे, विजय साळसकर, अशोक कामटे, तुकाराम ओंबळे, शशांक शिंदे, अंबादास पवार, मुकेश जाधव, मुरलीधर चौधरी, राहूल शिंदे, प्रकाश मोरे, विजय खांडेकर, बापूराव धुरगुडे, बळवंत भोसले, जयवंत पाटील, योगेश पाटील, अरूण चित्ते, संदीप उन्नीकृष्णन व गजेंद्रसिंग बिश्त या १८ बहाद्दर वीरांच्या शौर्यगाथेचा इतिहास संजय वाघ यांनी चित्रमयी शैलीत मांडला आहे.

शहिदांच्या मरणातही भेदभाव करणारे काही सांस्कृतिक दलाल असतात. पण या लेखकाने मात्र उच्च अधिकारी आणि सामान्य पोलीस किंवा महाराष्ट्रीय- महाराष्ट्राबाहेरचा किंवा मराठी-अमराठी असा कोणताही भेद न करता निपक्षपातीपणाने अठराच्या अठरा वीरांच्या मृत्यूचा हुतात्मा म्हणूनच गौरव केला. मुख्य म्हणजे प्रचंड परिश्रम घेऊन प्रत्येक शहिदाच्या कुटुंबीयांना, नातेवाईक, मित्र, गावकरी, सहकारी यांना प्रत्यक्ष भेटून प्रत्येकाची जीवनकहाणी समजून घेतली. प्रत्येकाचे बालपण, शिक्षण, आयुष्यातील सुख-दु:खे, महत्त्वाच्या घटना, प्रवृत्ती, छंद, आवड-निवड, विविध नात्यांचे अनुबंध या सर्व तपशिलाचा सूक्ष्मपणे अभ्यास करून आकलन व अवलोकनाच्या ताकदीवर संजय वाघ यांनी १८ वीरांच्या जीवनकथा अर्थपूर्ण मोजक्या शब्दात पेलल्या.

एका अर्थाने हा १८ शहिदांचा चरित्रग्रंथ आहे. प्रत्येक चरित्र-कथेचा मध्यबिंदू म्हणजे २६/११ची भीषण घटना आहे. या घटनेतील थरार, नाट्य, भयानकता शब्दांच्या चिमटीत पकडताना संजय वाघ यांनी वस्तुनिष्ठतेला प्राधान्य दिलेय. काल्पनिकता, अलंकारिकता, रंजकता, कृत्रिमता यांना फाटा देऊनच ही चरित्रमालिका वाचकाच्या डोळ्यासमोर सिनेमासारखी उलगडत

जाते आणि मनाला सुन्न करून अनेक प्रश्नांचे काहुरही माजवते.

पोलीस आणि काठी यांची ऐतिहासिक एकरूपता, २१व्या शतकातील दहशतवाद, नक्षलवाद अशा संहारक अतिरेकी संघटनांच्या आधुनिक शस्त्र–अस्त्राशी मुकाबला करताना पराभव आणि मरण अटळ असल्याचे सत्य २६/११ ने पुन्हा उजागर केले. पोलीस विभाग हा केवळ अंतर्गत शांतता व कायदा संरक्षण करण्यासाठी असतो. हा समज आजही भल्याभल्या पुढाऱ्यांचा व पोलीस अधिकाऱ्यांचा आहे. तो तद्दन गैरसमज असल्याचे आता सिद्ध झालेय. आधुनिक धर्मवाद हा दहशतवादाशी एकरूप होऊनच आक्रमक होतो आणि त्याला मानवतेच्या गहिवराची शपथ लागत नसते. शिवाय अतिरेकी कारवायांना राष्ट्राच्या मर्यादा नसतात. त्यामुळे पोलिसांनाही युद्धाचे शिक्षण हवेच ! निदान काही विभाग तरी अचानक होणाऱ्या नागरी जीवनावरील हल्ल्याच्या सक्षम प्रतिकारासाठी सदैव सिद्ध हवेत. त्यासाठी लाठीकाठी पुरेशी नसते. सागरवाटा या केवळ कविता करण्यासाठी व लाटांचे अरोह–अवरोह पाहण्यासाठी नसतात. त्यावाटेने पारंपरिक व अपारंपरिक शत्रूही येऊ शकतात. याचे भान स्वार्थांध राजकारण्यांना नसतेच ! पण निदान पोलीस खात्यात निष्ठेने काम करणाऱ्या उच्च अधिकाऱ्यांना नसावे का? राजकारण्यांनीही सत्ताकारण केल्यावर थोडावेळ तरी जनतेच्या – देशाच्या हितासाठी देऊ नये काय? निष्ठावंत देशभक्तांचे रक्त सांडले जाण्याची अपरिहार्यता संबंधित मंत्री, नेते यांच्या माजोरीपणात व भ्रष्टाचारी भूमिकेत सापडत असेल तर लबाड पुढाऱ्यांच्या सत्ताकारणासाठी सीमेवर आणि कोणत्याही रणांगणावर सैनिकांनी का लढावे? कुणासाठी लढावे? पोलिसांनी का हकनाक मरावे असे अनेक प्रश्न निर्माण झालेत.

१८ बलिदान कथांचे नायक भारतमातेचे सुपुत्र असून, त्यांचे जगणे व मरणेही सार्थ ठरले. पण याच शहिदांच्या मृत्यूंचे भांडवल करून दूरदर्शनच्या वाहिन्यांची स्पर्धा चालली. पण वास्तवाचा संपूर्ण तपशील देण्यात मीडिया कमीच पडला. सामान्य माणसाला शहिदांची संख्या सांगितली जात होती. काही ठळक हुतात्मेच टीव्हीवर झळकत होते. संपूर्ण १८ हुतात्म्यांच्या जीवनाचा अधिकांश तपशील त्यांच्या पराक्रमाच्या पूर्व खुणांसह संजय वाघ यांनी या पुस्तकात रेखाटला आहे. त्यामुळे संपूर्ण जनतेच्या अंगणातच या सर्व वीरांच्या जीवनकथा तुळशी वृंदावनाप्रमाणे यापुढे पुजल्या जाऊ शकतात. वीरमरण पत्करलेल्या देशभक्तांच्या कुटुंबीयांच्या वेदना अंधारातून प्रकाशात आणण्याचे कार्य या पुस्तकाने केलेय. विशेषत: १८ शहिदांच्या मृत्यूपूर्वीच्या दिवशी व मृत्यूपूर्वी काहीवेळात वीरांच्या कुटुंबीयांशी झालेला संवाद व घडलेल्या घटना मीडियाला माहीत असण्याचे कारण नाही. नेमका तोच नाट्यपूर्ण तपशील संवेदनेसह संजय वाघ यांनी इथे साकारला. मरण दिवसाचे

आवश्यक संदर्भ, वीरांच्या भावभावना, पत्नी व मुलांशी झालेले बोलणे या पुस्तकात लक्षवेधक ठरले आहे.

स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतरही हुतात्म्यांची मालिका चालूच असल्याचे ऐतिहासिक सत्य या निमित्ताने पुन्हा पुढे आले. त्यामुळे स्वातंत्र्य रक्षणाचे पवित्र कार्य यापुढेही कठीण असून, नव्या पिढीने ते निष्ठेने केले पाहिजे याची जाणीव या पुस्तकाच्या वाचनातून होते. हजारो पुस्तकांच्या जत्रेमध्ये या पुस्तकाचे महत्त्व सदैव श्रेष्ठ राहील हा विश्वास आहे.

देशाचे संरक्षण केल्याशिवाय त्याचा सर्वांगीण विकास अशक्य आहे. प्राथमिक जबाबदारीच्या कर्तव्यापासून फारकत घेणाऱ्या सत्ताधाऱ्यांना शहिदांच्या मृत्यूचे मूल्य समजणारच नाही. तरीही हुतात्म्याच्या वंदनाचा फार्स तेच राजकारणी निर्लज्यपणे करण्यास पुन्हा पुन्हा आघाडीवर ! ही शोकांतिका थांबलीच पाहिजे हा विचार या पुस्तकाच्या वाचनातून प्रभावित होतो. हेच या चरित्रग्रंथाचे यश आहे.

संजय वाघ यांनी २६/११च्या हल्ल्यातील सर्व वास्तव संदर्भ तपशिलासह टिपलेत. शिवाय प्रत्येक वीर हुतात्म्याचे मोजके पण अर्थपूर्ण फोटोग्राफस्‌ही त्या त्या चरित्रकथेत दिलेत. त्यामुळे सर्वच शहिदांचे जीवन डोळ्यासमोर उभे राहते. हुतात्म्यांच्या मृत्यूचे मूल्य पचवणारी व्यापक राष्ट्रीय भूमिका, चित्रमय शैलीत वास्तव साकारणारी भाषा, वस्तुनिष्ठ निवेदन, निरीक्षण, आकलन, अवलोकनातून सिद्ध केलेले संशोधन 'आँखोदेखा हाल'सारखी मांडणी, मृत्यूंचे तांडव शब्दबद्ध करणारी गंभीर शब्दकळा, कुटुंबीयांच्या नाजूक भाव-भावनांचा गुंता आकळून समर्थपणे प्रगट करणारी अभिव्यक्तीची पद्धत आणि मुख्यत: हुतात्म्याच्या रक्ताशी इमान राखणारी अस्सल लेखणी ही संजय वाघ यांच्या ग्रंथलेखनाची वैशिष्ट्ये आहेत.

अनेक कारणांमुळे पोलीस हा जनतेचा कायम टीकेचा विषय झालेला आहे. त्या टीकेत काही प्रमाण तथ्यही आहे. परंतु पोलीससुद्धा समाजासाठी त्याग करू शकतात. प्राणाचे बलिदान देतात. या सत्याचे दर्शन २६/११च्या घटनेतून घडते. १८ शहिदांच्या मृत्यूने संपूर्ण महाराष्ट्राच्या पोलीसखात्याची शान वाढली. सर्वसामान्य माणसांचा पोलिसांकडे पहाण्याचा दृष्टिकोन बदलला. पोलिसांप्रती जनतेचा विश्वासही वाढला आणि आदरही वाढला. म्हणूनच या पुस्तकाची महती जनतेसह पोलीस विभागातही अधोरेखित करावी लागेल.

जन्माला येणारा प्रत्येक जीव मरतोच ! पण प्रत्येकाचा मृत्यू हा वंदनीय ठरतोच असे नाही. शहिदांच्या मृत्यूचे मूल्य संस्कृतीच्या प्रवाहात कुटुंबांच्या कक्षा ओलांडून सिद्ध होत असते. सामाजिक कृतज्ञतेचे भान ठेवूनच आधुनिक काळातील नवा इतिहास निर्माण करणाऱ्या १८ बलिदानाचा सन्मान अत्यंत

विनम्रपणे व कर्तव्यभावनेने संजय वाघ या सच्चा पत्रकाराने या ग्रंथात केला आहे. स्वातंत्र्यपूर्व राष्ट्रवादी चळवळीतील शहिदांच्या मालिकेचा सांधा या १८ हुतात्म्यांच्या बलिदानाशी जोडला गेलाय. म्हणूनच या शहिदांचे पुण्यस्मरण करून देणारा हा इतिहास सर्वार्थाने सदैव वंदनीय ठरतो.

**– प्राचार्य डॉ. श्रीपाल सबनीस**

# अभूतपूर्व हल्ला

**बुधवार,** दि. २६ नोव्हेंबर २००८. महाराष्ट्राची राजधानी व प्रमुख व्यापार केंद्र असलेल्या मुंबईचे गतिमान जीवन नित्यनेमाने सुरू होते. पायाला भिंगरी बांधल्यागत लोकलचा पाठलाग करीत दिवसपाळीचे काम आटोपून नोकरदारवर्ग घराच्या दिशेने निघाला होता. कोठे सायंकाळच्या गप्पांची मैफल तर कोठे मेजवाण्या सुरू होत्या. कोठे व्यापार–उद्योगाचे बोलणे सुरू होते, तर कोठे सर्वसामान्यांचे रडगाणे चालले होते. मुंबई नेहमीच्याच वेगाने धावत होती. सर्वकाही साचेबद्ध रितीने सुरळीत सुरू होते. रस्ते वाहनांच्या वर्दळीने अन् माणसांच्या गर्दीने फुललेले होते. सूर्यप्रकाशाची जागा पथदीपांनी घेतली होती.

### लिओपोल्ड कॅफेवर हल्ला


कोणाच्याही ध्यानीमनी नसतांना व मुंबई पूर्णपणे बेसावध असतांना रात्री ९.४० वाजेच्या सुमारास अचानक लिओपोल्ड कॅफेवर गोळीबार व बॉम्बस्फोट झाल्याचे कानावर येताच मुंबईकरांच्या काळजात धस्स झाले. लिओपोल्ड कॅफे हे कुलाब्यातील कायमस्वरूपी गजबजलेले ठिकाण. याठिकाणी देशी–विदेशी पार्टी शौकीनांची नेहमीच जत्रा भरलेली असते. मंद प्रकाशात व कर्णमधूर सुराच्या सुरावटींनी पार्टी रंगात आली असतानाच अतिरेक्यांनी हातबॉम्ब फेकून अंदाधुंद गोळीबार केला. एकाएकी झालेल्या हल्ल्याने लोक सैरभैर झाले. सर्वत्र एकच हाहाकार उडाला. विचार करण्याची ती वेळ नव्हती, म्हणून कॅफेमधील प्रत्येक जण जीवाच्या आकांताने वाट दिसेल त्या रस्त्याने पळू लागला. त्याच सुमारास गस्तीवर असलेली कुलाबा पोलीस ठाण्याची मोबाईल व्हॅन घटनास्थळी दाखल होताच अतिरेकी ताजच्या दिशेने पसार झाले. तोपर्यंत नऊजणांची प्राणज्योत मालवली होती.

### एकाचवेळी तीन ठिकाणी हल्ले

रात्री ९.५० वाजेच्या सुमारास अतिरेक्यांनी एकाचवेळी छत्रपती शिवाजी टर्मिनस, ओबेराय–ट्रायडण्ट व हॉटेल ताजवर नियोजनबद्धरीत्या हल्ला चढवला. पहिला हल्ला लिओपोल्ड कॅफेवर झाल्याचे वृत्त काही क्षणातच अवघ्या मुंबईत वाऱ्यासारखे पोहोचले होते. त्या वृत्ताने सर्वतोमुखी हळहळ आणि तीव्र संताप व्यक्त होत होता. त्यानंतर केवळ दहा मिनिटांच्या अंतराने एकाच वेळी तीन ठिकाणी हल्ले झाल्याने अष्टौप्रहर लोकलसारखी धावणाऱ्या मुंबईचे गतिमान जीवन जागच्या जागी थबकले होते. एकामागून एक होणाऱ्या हल्ल्याने मुंबईचे पोलीस दलही तोपर्यंत सतर्क झाले होते.

### सीएसटीवर रक्तपात

छत्रपती शिवाजी टर्मिनस प्रवाशांच्या गर्दीने खच्चून भरलेले होते. काही प्रवाशी रेल्वेची प्रतीक्षा करीत आपल्या मुलाबाळांसह सामानाजवळ बसलेले तर काहीजण निवांत झोपलेले होते. काही गप्पांमध्ये रंगले होते तर काही तिकीट खिडकीजवळील रांगेत उभे होते. हमालांची रोजची ये–जा सुरू होती तर लोकलमधून उतरलेले काही नोकरदार घराच्या दिशेने निघाले होते. सर्वच प्रवाशी गाफील असताना कसाब व इस्माईल ही दोन हिंस्र श्वापदे रेल्वेस्थानकावरील गर्दीत शिरतात. दोघांजवळ



**छत्रपती शिवाजी टर्मिनसवर हल्ल्यानंतर एका वृद्धाला वाट करून देताना पोलीस कर्मचारी.**

स्वयंचलित अशा अत्याधुनिक बंदुका. रेल्वेस्थानकातील शौचालयात जाऊन बंदुका लोड करून अंगात सैतान संचारल्यागत प्रवाशांसाठी यमदूत बनून ते बाहेर येतात. कोणाला काहीही कळण्याच्या आत रेल्वेस्थानकाच्या हॉलमध्ये ते ग्रेनेड फेकतात. अचानक झालेल्या स्फोटकाच्या आवाजाने प्रवाशी बिथरतात. सर्वत्र एकच हलकल्लोळ माजला असताना अतिरेक्यांमधील हिंसक प्रवृत्ती अधिक उफाळून येते. रेल्वेस्थानकावर सैरावैरा धावणाऱ्या प्रवाशांवर अंदाधुंद गोळीबार करीत अघोरी आनंदही ते साजरा करतात. एरवी रेल्वेच्या आवाजात हरव-लेल्या रेल्वेस्थानकाची जागा अंगावरील जखमांमुळे किंचाळ्यांनी व्यापलेली असते. सर्वत्र रक्ताचा सडा व अंगावरील गंभीर जखमांनी विव्हळणाऱ्या प्रवाशांमुळे रेल्वेस्थानकाला युद्धभूमीचे स्वरूप प्राप्त झालेले असते. एकाएकी झालेल्या हल्ल्यामुळे बिथरलेल्या व भयभीत झालेल्या प्रवाशांकडे बघून अतिरेकी कुत्सित हास्य करीत होते, तर जीवाच्या आकांताने प्रवाशी जागा मिळेल त्या दिशेने सैरावैरा धावत होते.

छत्रपती शिवाजी टर्मिनसवर अचानक झालेला हल्ला पाहून पोलीस निरीक्षक शशांक शिंदे यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत मुख्य हॉलकडे धाव घेतली. दोन

## *पोलिसांची जिद्द वाखाणण्याजोगी*


***छत्रपती** शिवाजी टर्मिनसवर शहीद झालेल्या पोलीस निरीक्षक शशांक शिंदे, पोलीस शिपाई अंबादास पवार, रेल्वे पोलीस दलाचे हवालदार एम. एल. चौधरी व गृहरक्षक दलाचे मुकेश जाधव यांच्या खांद्याला खांदा लावून अन्य पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अतिरेक्यांशी धैर्याने झुंज दिली. पार्सल विभागातील सहाय्यक पोलीस निरीक्षक राठोड यांनी पोलीस शिपाई ए. डी. नलावडे यांच्या मदतीने भिंतीचा आडोसा घेत गोळीबार केला. मात्र अतिरेकी टप्प्यात नसल्याने यश मिळाले नाही. त्याचवेळी फलाट क्र. ६च्या बाजूला लोकलचा आडोसा घेत पोलीस शिपाई – एम. एम. नरडेले यांनी आठ फैरी झाडल्या. त्यामुळे दोघे अतिरेकी लोकल लाईन हॉलमध्ये आले. त्याच दरम्यान गस्तीवर असलेल्या सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सुदाम पंदरकर यांनी अतिरेक्यांच्या दिशेने तीन गोळ्या झाडल्या. त्याच्या उत्तरादाखल अतिरेक्यांनी केलेल्या गोळीबारात पंदरकरांच्या उजव्या खांद्याला गोळी लागल्याने ते जखमी झाले. अतिरेक्यांना चोख प्रत्युत्तर मिळत असल्याचे पाहून ते लोकल हॉलच्या दरवाजातून फुटपाथवर गेले, तेथून पुन्हा फलाट क्र. १ वर येऊन त्यांनी गोळीबार केला. त्यात पोलीस शिपाई ए. डी. काळे जखमी झाले. अतिरेक्यांचा सामना करतांना सहाय्यक पोलीस निरीक्षक भरत भोसले, पांडुरंग पाटील, होमगार्ड, विश्वेश्वर पाचारे व उत्तम सासुलकर यांनाही अंगावर गोळ्या झेलाव्या लागल्या. या जखमी पोलीस अधिकारी, कर्मचारी व गृहरक्षक दलाच्या जवानांना तात्काळ उपचार मिळाले म्हणून त्यांचेही प्राण वाचू शकले. मात्र त्यांनी दाखविलेली जिद्द वाखाणण्यापलीकडची होती.*

अतिरेकी हातात अत्याधुनिक बंदुका घेऊन रेल्वेस्थानकावरील प्रवाशांवर अंदाधुंद गोळीबार करीत असल्याचे शिंदे यांच्या निदर्शनास आले. निरपराध प्रवाशी वेदनेने विव्हळत असल्याने संपूर्ण रेल्वेस्थानकावर आकांत, आक्रोश आणि वेदनेचे चित्कार सुरू होते. अत्याधुनिक शस्त्रानिशी सज्ज असलेल्या केवळ दोघा अतिरेक्यांनी प्रवाशांना सळो की पळो करून सोडले होते. एकमेकांना फायरिंग कव्हर देत त्या दोघांचे रेल्वेस्थानकावर तांडवनृत्य सुरू होते. घडणारा प्रकार पाहून पोलीस निरीक्षक शशांक शिंदे यांनी त्वरित पोझिशन घेत आपल्याजवळील नऊ एमएमच्या रिव्हाल्व्हरने अतिरेक्यांना टिपण्याचा प्रयत्न सुरू केला. त्याच सुमारास ड्यूटी संपलेली असताना केवळ फायरिंगच्या आवाजाने मागे फिरलेले अंबादास पवार व ड्यूटीवर असलेले रेल्वे सुरक्षा दलाचे एम. एल. चौधरी, गृहरक्षक दलाचे मुकेश जाधव व अन्य पोलीस

अधिकारी, कर्मचारी वेगवेगळ्या स्पॉटवर खिंड लढवित प्रवाशांना सुरक्षितस्थळी हलविण्याचा प्रयत्न करीत होते. दरम्यान, रेल्वेस्थानकावर सुरू असलेले भयावह दृश्य उद्घोष कक्षातून मध्य रेल्वेचे उद्घोषक विष्णू झेंडे असहायपणे पाहत होते. उद्घोषणेच्या माध्यमातून संकटात सापडलेल्या प्रवाशांचे प्राण वाचविता येतील, असा सूचक विचार त्यांच्या मनात डोकावताच झेंडे यांनी 'प्रवाशांनो, मागील गेटने बाहेर पडा, मुख्य हॉलकडे जाऊ नका व लोकलमधून बाहेर निघू नका', अशा सूचना ध्वनिक्षेपकावरून वारंवार केल्या. त्यामुळे गांगरलेल्या प्रवाशांना काय करावे याची दिशा मिळत गेली. दुसरीकडे पोलीस कर्मचारी व अधिकारी प्रवाशांना मदतही करीत होते व बेभान झालेल्या अतिरेक्यांना टिपण्याचा प्रयत्नही करीत होते.

रात्रीचा अंधार आणि प्रवाशांची पळापळ यामुळे अतिरेक्यांचा नेमका अंदाज येत नव्हता, त्याही परिस्थितीत शिंदे फलाट क्र. ७च्या बाजूला आले. तेथील एटीएमजवळील खांबाचा आडोसा घेऊन ते एका अतिरेक्याला टिपण्याचा प्रयत्न करीत होते. त्याचवेळी मागून आलेल्या कसाबने शिंदे यांच्यावर गोळीबार केला. चार गोळ्या पाठीत शिरल्याने बराच रक्तस्राव झाल्याने सीएसटीवरील खंदा लढवय्या धारातीर्थी पडला. २६/११च्या हल्ल्यातील पहिले

**अतिरेक्यांच्या दिशेने नेम धरताना**





वीरमरण शिंदे यांना आले. त्याच सुमारास वेगवेगळ्या आघाड्यांवर लढत असलेल्या मुरलीधर चौधरी, मुकेश जाधव व अंबादास पवार यांनाही वीरमरण आले. केवळ अर्ध्यातासापेक्षाही कमी काळात रानटीवृत्तीच्या ह्या नराधमांच्या हल्ल्यात भारतमातेचे चार सुपुत्र शहीद तर ४८ प्रवाशी मृत्युमुखी पडले होते. पोलीस कर्मचाऱ्यांसह गृहरक्षक दलाचे नऊ तर ९७ प्रवाशी जखमी झाले होते. लोकांना ओलिस ठेवून मुंबईचे अधिकाधिक नुकसान करण्याच्या इराद्याने उंच इमारतीच्या शोधार्थ सीएसटीबाहेर पडलेल्या अतिरेक्यांनी नंतर कामा इस्पितळात धुमाकूळ घातला.

## ओबेरॉय - ट्रायडण्टही लक्ष्य

मुंबईचे एक आकर्षक केंद्र असलेल्या प्रशस्त अशा हॉटेल ओबेरॉय ट्रायडण्टमध्ये नेहमीसारख्या पार्ट्या रंगल्या होत्या. परिसर आनंद आणि उत्साहाने भारलेला होता. अचानक रात्री ९.५० वाजेच्या सुमारास या हॉटेलमध्ये दोन अतिरेकी घुसतात. घुसताक्षणीच गोळीबाराच्या फायरिंग करून ते वातावरणाचा नूरच पालटून टाकतात. हॉटेलमध्ये प्रवेश करताना वाटेत येईल त्यावर गोळीबार करीत ते ओबेरॉयच्या वरच्या मजल्यावर जातात. तोपर्यंत २३ निरपराध लोकांची हत्त्या झालेली असते. ओबेरॉयवरील हल्ल्याचे वृत्त शहरात पसरताच पोलीसही घटनास्थळी दाखल होतात. अतिरेक्यांकडून होणाऱ्या गोळीबारामुळे व ग्रेनेडच्या हल्ल्याने भयभीत झालेल्या नागरिकांची व हॉटेलमधील कर्मचाऱ्यांची जीवाच्या आकांताने पळापळ सुरू होते. २३ जणांचा जीव घेऊन अतिरेकी हॉटेल ओबेरॉयच्या १६व्या व १८व्या मजल्यावर जाऊन तेथे उपस्थित असलेल्यांना ओलिस ठेवतात. केव्हा आपण अतिरेक्यांच्या गोळीला बळी पडू, अशी धागधूग मनात घेऊन काहीजण असहायपणे उभे असतात. अवघ्या काही क्षणातच हॉटेलमधील आनंदाच्या जागेवर दु:खाची छाया पसरून जाते.


## हॉटेल ताजवर हल्ला

बुधवारी रात्री ९.५० वाजेच्या सुमारास सीएसटी व ओबेरॉय ट्रायडण्टवर हल्ला झाला. त्याचवेळी ताजवरही अतिरेक्यांनी हल्ला चढविला. अरबी समुद्राजवळ सुमारे एकशेपाच वर्षांपासून दिमाखदारपणे उभी असलेली हॉटेल ताज ही देशी-विदेशी पर्यटकांच्या दृष्टीने एक आकर्षणाचे केंद्र आहे. परदेशी पर्यटक, उद्योग-व्यवसायातील बड्या आसामींसह देशातील उच्चभ्रू वर्ग ताजमध्ये हजेरी लावणे प्रतिष्ठेचे मानतो. ताजच्या ५६५ खोल्यांमध्ये एकाचवेळी वेगवेगळे कार्यक्रमांत रंगत आलेली होती. अचानक दोन अतिरेकी अत्याधुनिक हत्यारांसह ताजमध्ये शिरतात. क्षणाचाही विलंब न करता बेधुंदपणे गोळीबार करतात. पहिलीच फायरिंग वीस जणांचा बळी घेऊन जाते. पाच मिनिटांपूर्वी जे वातावरण होते ते पूर्णत: बदलून जाते. संपूर्ण ताजच्या परिसरात मृत्यूची छाया पसरते. दहा मिनिटांपूर्वी लिओपोल्ड कॅफेवर हल्ला करणारे दोघे अतिरेकीसुद्धा ताजमधील दोन अतिरेक्यांना येऊन मिळतात. चौघेजण ताजच्या सहाव्या मजल्याच्या दिशेने हॉटेलला आग लावतात, त्यात चारजण होरपळून मृत्युमुखी पडतात.

ताजमध्ये आलेल्या देशी-विदेशी पाहुण्यांसह अवघे हॉटेल व्यवस्थापनही गोंधळून जाते. अशा बिकटसमयी नेमके काय करावे, ते कोणालाच सूचत नाही. तरी व्यवस्थापनाकडून मार्गदर्शक सूचना देणे अव्याहतपणे सुरूच असते. अकस्मात झालेला हल्ला व आगीच्या ज्वालांची चर्चा शहरभर पसरते. पोलीस यंत्रणाही खडबडून जागी होते. पोलीस उपायुक्त विश्वास नांगरे-पाटील आपल्या सहकाऱ्यांसमवेत घटनास्थळी दाखल होतात. ताजमध्ये आल्यानंतर तेथील सिक्युरिटी चीफ तसेच अंगरक्षक अमित खेटाळेला घेऊन नांगरे-पाटील ताजच्या दुसऱ्या मजल्यावर जातात. अतिरेकी तिसऱ्या मजल्याच्या जिन्यामध्ये असतात. त्या दिशेने गोळीबार केल्याने एक अतिरेकी जखमी होतो. समोरून होणारा गोळीबार पाहून अतिरेकी दचकतात, सावध होतात. विश्वास नांगरे-पाटील ताजचा चौथा, पाचवा आणि सहावा मजला पिंजून काढतात. या

अधिकाऱ्यांची नजर चुकवून अतिरेकी पाचव्या मजल्यावर दडून बसतात. रात्री ११ वाजेच्या सुमारास गुन्हे शाखेचे पोलीस आयुक्त, अतिरिक्त पोलीस आयुक्त व पाटील हल्ला परतावून लावण्याच्या दृष्टीने नियोजन करतात. फ्रान्स फायरिंग व नाकेबंदी करून पहाटे तीन वाजेपर्यंत अतिरेक्यांना सहाव्या मजल्यावर ते अडवून ठेवतात. या मोहिमेत पोलीस उपायुक्त राजवर्धन, पोलीस निरीक्षक ढोले, उपनिरीक्षक काकडे, खेटाळे, समाधान मोरे व एसआरपी जवान राहुल शिंदे यांचा समावेश असतो. त्याच सुमारास सहाव्या मजल्यावर झालेल्या हातबॉम्बच्या स्फोटात राहुल शिंदे गंभीर जखमी होऊन धारातीर्थी पडतो, तर मोरे व खेटाळे जखमी होतात. त्यानंतर उपायुक्त राजवर्धन आणि पाटील हे दोघे अधिकारी पहाटे चार वाजेपर्यंत जिन्याची खिंड अडवून ठेवतात. तोपर्यंत अग्निशमन विभागाचे मुख्य अधिकारी अनिल सावंत यांचे आपल्या सहकाऱ्यांसह आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न सुरू झालेले असतात. ते ताजमध्ये पोहोचतात तेव्हा पोलीस–अतिरेक्यांत गोळीबार सुरू असतो. एकीकडे सहावा मजला आगीने होरपळत असतो तर दुसरीकडे हॉटेलमधील माणसं जीवाच्या आकांताने खिडक्यांमध्ये लोंबकळत असतात. अशावेळी अग्निशमन दलासमोर संकटग्रस्त लोकांना धीर देण्याचे, त्यांचे प्राण वाचविण्याचे

**जखमींना उपचारासाठी नेताना**



“

## डॉक्टरांचे मदतकार्य कौतुकास्पद

*__मुंबईत__ २६ नोव्हेंबर रोजी झालेल्या वेगवेगळ्या हल्ल्यात अतिरेक्यांनी केलेल्या अंदाधुंद गोळीबारात पोलीस अधिकाऱ्यांसह, कर्मचारी, गृहरक्षक दलाचे कर्मचारी गंभीर जखमी होत होते. शरीराच्या विविध भागात गोळ्या शिरल्याने रक्तस्त्राव मोठ्या प्रमाणात होत असल्याने जखमींना मिळेल त्या वाहनाने सेंट जॉर्ज, जेजे, जीटी, केईएम, सायन, नायर आणि बॉम्बे हॉस्पिटलमध्ये दाखल केले जात होते. घटना उशीरा घडल्यामुळे बहुतांशी डॉक्टर, परिचारिका व कर्मचारी आपापल्या घरी परतले होते. मात्र घटनेची तीव्रता लक्षात घेता 'रुग्णसेवा हीच खरी ईश्वरसेवा' मानणाऱ्या डॉक्टरांमधील सहहृदयी रुग्णसेवक जागा झाला होता. त्यामुळेच त्यांनी स्वेच्छेने रुग्णालयाकडे धाव घेतली. बरेचशा रुग्णालयामध्ये खाटा अपूर्ण पडाव्यात इतकी जखमींची गर्दी होत होती. सर्वत्र धावपळ, वेदनांनी विव्हळणे, उपचारासाठी मदतीची याचना करणे, शस्त्रक्रियेसाठी तत्परता व काहींना गर्दीमुळे उपचारासाठी ताटकळत पडून राहण्याचे चित्र दिसत होते. आपापल्या जखमी नातलगावर तात्काळ उपचारासाठी डॉक्टरांना साकडे घालत होते, कधी डॉक्टरांशी भांडत होते. डॉक्टरदेखील आपल्या दोघा हातांनी एकेका जखमींवर उपचारकार्य जोमाने करीत होते. वेगवेगळ्या टेबलवर शस्त्रक्रिया करण्यात येत होत्या. रुग्णालयाची मर्यादा लक्षात घेता डॉक्टरही हतबल झाले होते. आपला कोण नातेवाईक जखमी झालेला आहे का हे पाहण्यासाठीही गर्दीत भर पडत होती, त्या वाढत्या गर्दीमुळेसुद्धा डॉक्टरांच्या उपचारकार्यात अडथळे निर्माण होत होते. तरीदेखील डॉक्टरांचे मदतकार्य अहोरात्र सुरू होते. ल्ल्यात जखमी झालेल्यांचा रक्तस्त्राव अधिक प्रमाणात झाल्याने त्यांना रक्त कमी पडू नये म्हणून सर्वच मुख्य रुग्णालयांमध्ये रक्तदान करण्यासाठी रक्तदात्यांनी रिघ लावलेली होते. सर्वत्र परस्परांविषयीचे आपुलकी व आत्मियतेचे चित्र दिसत होते. याचबरोबर मंत्रालयातील सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभागाने आपत्कालिन कक्ष सुरू करून जखमी झालेल्यांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिलेली होती. त्यामुळे राज्यातील व राज्याबाहेरील जनतेला आपण जखमी नातेवाईक शोधणे सोपे जात होते. एकूणच चित्र हृदय हेलावून टाकणारेच होते.*

”

व आग आटोक्यात आणण्याचे लक्ष्य असते. बुधवारी रात्री १ वाजेपासून सुरू केलेली मोहीम शुक्रवारी सकाळी ८ वाजेपर्यंत सुरू असते. या कालावधीत अग्निशमन दलाचे सह मुख्य अधिकारी करगोप्पीकर, उपमुख्य अधिकारी ए. एन. शिंदे, उदय तटकरे, रमेश कोलकुंबे पाटील, एस. एच. मुजावर, एस. ए. माळी, एस. के. राणे, व्ही. एम. पाणीग्रही, एस. जी. अमिन या अधिकाऱ्यांसह जवानांना आग आटोक्यात आणण्यात यश मिळते. मात्र तोपर्यंत उपस्थानक अधिकारी रोहन मोरे व यंत्रचालक मोहनलाल तावरे जखमी झालेले असतात.

## नरिमन हाऊसवर कब्जा

सीएसटी व ताज हॉटेलपाठोपाठ अतिरेक्यांनी रात्री १० वाजेच्या सुमारास नरिमन हाऊस या पाच मजली इमारतीवर कब्जा केलेला असतो. नरिमन हाऊसमध्ये ज्यू धर्मीयांसाठी छाबड सेंटर नावाने केंद्र चालविले जाते. या इमारतीत बाहेरून येणाऱ्या ज्यू पर्यटकांची वर्दळ सारखी सुरू असते. नरिमन हाऊसला लागून प्रदीप हाऊस, मेहता हाऊस, कस्तुरी हाऊस या इमारती आहेत. त्यातील लोकांच्या जीवाला धोका पोहोचू नये हे लक्षात घेऊन त्याठिकाणी उपस्थित असलेले सहाय्यक पोलीस आयुक्त इसाक बागवान तात्काळ नियंत्रण कक्षाशी संपर्क साधतात. त्यानुसार राज्य राखीव दलाची तुकडी मागवून त्याठिकाणी जवान तैनात करण्यात येतात. हा सर्व कल्लोळ पाहण्यासाठी इमारतीजवळ बघ्यांची गर्दी दाटलेली असते. अतिरेकी इमारतीवरूनच खाली जमलेल्या घोळक्यावर हातबॉम्ब टाकतात. हा प्रकार कुलाबा कोर्ट इमारतीतील एक जोडपे खिडकीतून पाहण्याचा प्रयत्न करीत होते. अतिरेक्यांचे तिकडे लक्ष जाताच त्यांनी केलेल्या गोळीबारात ते दांपत्य मृत्युमुखी पडते. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे लक्षात येताच राज्य राखीव दलाच्या दुसऱ्या तुकडीला व पाच कमांडोंना पाचारण करण्यात येते. काही वेळेनंतर शीघ्र कृती दलाचे जवानही मोहिमेत सहभागी होतात. तोपर्यंत ११ निरपराध लोकांना प्राणास मुकावे लागले होते.

## टॅक्सीत स्फोट

नरिमन हाऊसमध्ये गोळीबार व हॅण्डग्रेनेडचा हल्ला होत असतानाच रात्री १०.३७ वाजेच्या सुमारास माझगाव बीपीटी कॉलनीत एका टॅक्सीमध्ये पहिला स्फोट होतो. त्यानंतर केवळ आठ मिनिटांच्या अंतराने विलेपार्ले येथील वेस्टर्न एक्स्प्रेस हायवेवर दुसरा स्फोट होतो. शहरातील वेगवेगळ्या भागात हल्ले व स्फोटांची मालिका सुरू झाल्याने महाराष्ट्राची राजधानी असलेली मुंबई कमालीची हादरून जाते.

## कामा रुग्णालयात धुमाकूळ


छत्रपती शिवाजी टर्मिनस (सीएसटी)वर हाहाकार उडवून हल्ल्यासाठी उंच इमारतीच्या शोधार्थ निघालेले कसाब व इस्माईल टाईम्स गल्लीतून कामा रुग्णालयात शिरतात. त्याठिकाणी रुग्ण पाहताच आपण आलेलो वास्तू रुग्णालय असल्याचे त्यांच्या निदर्शनास येते व त्यांचा काहीसा हिरमोड होतो. तरी ते दोघे सहाव्या मजल्यावरून खाली हॅण्डग्रेनेडचा मारा सुरू करतात. त्याच सुमारास तेथून जाणाऱ्या गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलीस आयुक्त देवेन भारती यांना अतिरेकी कामाच्या सहाव्या मजल्यावर असल्याचा निरोप मिळतो. भारती शेजारील उंच इमारतीवर जाऊन अतिरेक्यांवर गोळीबार करतात; मात्र अतिरेक्यांपर्यंत त्यांची रेंज पोहोचतच नाही. अतिरेक्यांचे चिडून

निरपराध मुलांवर व सुरक्षारक्षकांवर गोळीबार करणे सुरूच असते. या कालावधीत 'कामा'मध्ये अतिरेकी शिरल्याची माहिती अतिरिक्त पोलीस आयुक्त सदानंद दाते यांना मिळते. रात्री ११.०३ वाजेच्या सुमारास पोलीस निरीक्षक प्रकाश मोरे, विजय

पवार, शिपाई विजय खांडेकर, शिंदे आदिंच्या लवाजम्यासह दाते 'कामा'मध्ये पोहोचतात. सर्व सहकाऱ्यांकडे कार्बाईन, लोडेड पिस्तूल व रिव्हाल्व्हर असतात. ते सर्वजण रुग्णालयाच्या लिफ्टने पाचव्या मजल्यावर जातात. तेथील वॉचमनने दिलेल्या माहितीनुसार सहाव्या मजल्यावर आणि टेरेसवर अतिरेकी असल्याचे त्यांना समजते. दाते सर्वांना सावध करतात. टेरेसच्या दिशेने गेल्यावर त्याठिकाणी कोणी आहे का याचा अंदाज घेण्यासाठी एक धातूचा तुकडा फेकतात. त्यास प्रत्युत्तर म्हणून तात्काळ अतिरेक्यांकडून स्वयंचलित शस्त्रातून फैरी झाडल्या जातात. दातेंसह सर्वजण सहाव्या मजल्यावर येऊन जिन्याजवळ पोझिशन घेतात. त्याचवेळी नियंत्रण कक्षाला वाढीव कुमक पाठविण्याचा संदेशही ते पाठवितात.

अतिरेकी कोंडीत सापडलेले असतात. ती कोंडी फोडण्याचा

**मुंबईवर हल्ला झाल्यानंतर त्याचे चित्रिकरण करण्यासाठी वृत्तवाहिन्यांची सुरु असलेली धावपळ**





**अतिरेक्यांच्या मागावर असलेले एनएसजीचे कमांडो.**

प्रयत्न म्हणून ते जिन्याच्या दिशेने हॅण्डग्रेनेड फेकतात. त्यात मोरे, खांडेकर गंभीर जखमी होतात तर दाते यांच्या डोळ्याला जखमा होतात. सुमारे अर्धा तास ग्रेनेडचा मारा व गोळ्यांच्या फैरी झडत असतात. खांडेकर पुन्हा आपल्या वायरलेसवरून 'आम्हाला मदत पाठवा' हा शेवटचा संदेश देतात, तरी त्यांच्यापर्यंत मदत पोहोचलेली नसते. रात्री १२.४५ वाजेच्या सुमारास अतिरिक्त पोलीस आयुक्त टेमकर घटनास्थळी दाखल होतात; मात्र तोपर्यंत उशीर झालेला असतो... खांडेकर आणि मोरे हे भारतमातेचे दोन सुपुत्र अतिरेक्यांशी झुंज देताना शहीद झालेले असतात.

## बापूराव धुरगुडे शहीद

जखमी दाते यांना घेऊन टेमकर केईएमकडे रवाना होतात, तर पिसाळलेले कसाब आणि इस्माईल 'कामा'च्या खाली येतात. दोघांचा पेहराव कॉलेजकुमारांसारखा असतो. कामा लेनमध्ये डोळ्यात तेल घालून ड्यूटी बजावणाऱ्या बापूराव धुरगुडे यांना हे दोघे अतिरेकी दिसतात. ते कॉलेजकुमार समजून धुरगुडे त्यांना 'कामा'कडे जाऊ नका, अतिरेकी आलेत असे बजावतात. धुरगुडे ज्यांची किव करायला जातात ते कॉलेजकुमार भासणारे युवकच धुरगुडेंवर गोळीबार करून त्यांचा जीव घेऊन जातात. 'कामा'मधून पसार होऊन मुंबईत हल्लाबोल करण्यासाठी ते अतिरेकी एखाद्या वाहनाची प्रतीक्षा करीत असतात. रंगभवनच्या गल्लीतील एटीएमजवळील झुडपाआड

ते दोघे दबा धरून बसलेले असतात.

## नियतीने डाव साधला

'कामा'मधील अतिरेक्यांसोबतची दाते, खांडेकर व मोरे यांची लढाई सुरू असताना करकरे, कामटे व साळसकर टाईम्स गल्लीतून एकमेकांना फायरिंग कव्हर देत पुढे येत असतात. त्यांना कामा रुग्णालयाजवळ असणाऱ्या इमारतीवरून ग्रेनेडचे स्फोट झाल्याचा आवाज येतो. संजय मोहिते यांना करकरे आझाद मैदान पोलीस क्लबच्या गेटजवळ जाण्याच्या सूचना करतात. 'कामा'कडून होणारे फायरिंग व स्फोटाचे आवाजही तोपर्यंत बंद झालेले असतात. तितक्यात पायधुनी पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस आयुक्तांचे वाहन त्याठिकाणी येते. त्या गाडीचा ताबा घेत साळसकर चालकाच्या सीटवर तर मध्यभागी करकरे व शेजारी कामटे बसतात. मागील सीटवर बळवंत भोसले, योगेश पाटील, जयवंत पाटील व अरुण जाधव बसतात. रंगभवनच्या गल्लीतून जाताना कामटे व साळसकरांना एका झुडपाजवळ संशयास्पद हालचाली दिसतात. कामटे त्या दिशेने गोळीबार करतात. त्यांची ती गोळी कसाबच्या हाताचा वेध घेते. त्यापाठोपाठ साळसकरांनी झाडलेली गोळीसुद्धा कसाबच्या त्याच जखमी हाताला लागल्याने त्याच्या हातातून एके-४७ खाली पडते. अतिरेकी आणि त्या तीनही अधिकाऱ्यांमध्ये फारसे अंतर नसते. ते दोघे अतिरेकी वाहनासमोर येऊन अंदाधुंद गोळीबार करतात. त्यात करकरे, कामटे व साळसकर यांना अंगातील बुलेटप्रूफ जॅकेटमुळे खाली वाकता न आल्याने त्यांच्या शरीरात ठिकठिकाणी गोळ्या शिरलेल्या असतात. साळसकरांच्या श्वासात थोडीशी धुगधुगी सुरू असते तर कामटे, करकरे यांच्यासह पाठीमागील सीटवरील भोसले, योगेश पाटील, जयवंत पाटील या पाच खंद्या वीरांना जागीच वीरमरण आलेले असते. एकाचवेळी व एकाच ठिकाणी तीन मोठ्या पदावरील अधिकाऱ्यांसह तीन कर्मचाऱ्यांना वीरमरण आल्याची ती बहुधा पहिलीच घटना असते. करकरे, कामटे व साळसकरांना वाहनाखाली लोटून ती दोनही हिंस्त्र श्वापदे सुसाट वेगाने मेट्रोकडे निघून जातात.

## अरुण चित्तेही शहीद

रंगभवनकडून सुसाट वेगाने येणारे वाहन व त्यातील गोळीबार करीत येणाऱ्या अतिरेक्यांना अडविण्याच्या प्रयत्नात साळसकर यांचे वाहनचालक अरुण चित्ते मेट्रोजवळ शहीद होतात. तेथून कसाब व इस्माईल त्याच वेगाने विधानभवनाकडे पसार होतात. रस्त्यात वाहनाचे टायर फुटल्याने ते वाहन त्याच ठिकाणी सोडून दुसऱ्या एका वाहनाला अडवून अतिरेकी गिरगाव चौपाटीच्या दिशेने निघतात. तोपर्यंत आधीच्या वाहनात जखमी होऊन पडलेले अरुण जाधव स्वत:जवळील बिनतारी संदेश यंत्रणेद्वारे अतिरेकी गिरगाव चौपाटीकडे निघाल्याचा संदेश देतात.

## कसाब जेरबंद; ओंबळे शहीद

जाधव यांनी दिलेल्या संदेशामुळे सावध होऊन कसाब आणि इस्माईल चौपाटीपर्यंत पोहोचण्याआधीच सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक तुकाराम ओंबळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी बॅरिकेटस् लावून सापळा रचलेला असतो. समोर नाकाबंदी असल्याचे पाहताच कसाब आणि इस्माईल बिथरतात. ते दोघेही जोरात यू टर्न घेऊन पळण्याच्या तयारीत असताना सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर कदम अचूक नेम

साधत वाहन चालवित असलेल्या इस्माईलला टिपतात. इस्माईल जखमी झाल्याचे पाहून पसार होण्याच्या तयारीत असलेल्या शस्त्रधारी कसाबवर काही फुटाच्या अंतरावर हातात केवळ काठी घेऊन उभे असलेले व वयाची पन्नाशी उलटलेले ओंबळे जीवाची पर्वा न करता तुटून पडतात. कसाबच्या मुसक्या आवळतात; मात्र सावध झालेल्या कसाबने त्याही स्थितीत चार गोळ्या ओंबळेंच्या कंबरेत घातलेल्या असतात. तोपर्यंत अन्य सहकारी येऊन कसाबला ताब्यात घेतात. कसाब नावाचे हिंस्र श्वापद जेरबंद झालेले असते. मात्र ओंबळे नावाचा एक झुंजार, धाडसी वीर धारातीर्थी पडलेला असतो.

## ५९ तासांनंतर मोहीम फत्ते

सीएसटी, लिओपोल्ड कॅफे, कामा रुग्णालयावरील जीवघेणे हल्ले व अन्य ठिकाणच्या छोट्या–मोठ्या स्फोटांचे सत्र थांबलेले असते. मात्र नरिमन हाऊस व ताजमधील अतिरेक्यांचे जीवघेणे सत्र सुरूच असते. महाराष्ट्रीयन पोलिसांच्या आवाक्याबाहेर सर्व प्रकरण गेलेले असते. अतिरेक्यांविरुद्ध उघडलेल्या मोहिमेस अंतिम रूप देण्यासाठी राष्ट्रीय सुरक्षा दलाच्या (एनएसजी) कमांडोंना पाचारण करण्यात येते. एनएसजी कमांडोंनी तहान–भूक विसरून व प्राणाची बाजी लावून सुमारे ५९ तासांच्या अथक परिश्रमानंतर मोहीम फत्ते केलेली असते. तोपर्यंत मोठ्या प्रमाणात जीवितहानी व वित्तहानी झालेली असते. अतिरेक्यांच्या मुसक्या आवळण्याच्या या मोहिमेत एनएसजीचा कमांडो गजेंद्रसिंग बिश्त नरिमन हाऊसमधील कारवाईत तर ताजमध्ये अतिरेक्यांचा पाठलाग करताना मेजर संदीप उन्नीकृष्णन धारातीर्थी पडलेले असतात. ५९ तासांच्या त्या जीवघेण्या नाट्यात १८ जण शहीद, तर १७५ नागरिक मृत्युमुखी पडतात व सुमारे २३२ जण अंगावर जखमांचे व्रण घेऊन आजही त्या काळरात्रीला दोष देत जीवन कंठत आहेत. एनएसजी कमांडोंनी नरिमन व ताजवरील कारवाईला अंतिम रूप दिल्यानंतर मुंबई टप्प्याटप्प्याने सावरलेली असते. सीएसटीवरील लोकलसुद्धा पूर्ववत धावायला लागते... जुन्या कटु स्मृतींना उजाळा देत.. काहीशी दबकत तर काहीशा नव्या जोमाने...

## २६ नोव्हेंबरच्या रात्री असे झाले हल्ले

| | |
|---|---|
| ९.४० | – लिओपोल्ड कॅफे |
| ९.५० | – ताज |
| ९.५० | – ओबेराय ट्रायडण्ट |
| ९.५० | – सीएसटीवर गोळीबार |
| १०.०० | – नरिमन हाऊसमध्ये फायरिंग |
| १०.३७ | – माझगावच्या बीपीटी कॉलनीत टॅक्सीत बॉम्बस्फोट |
| १०.४५ | – विलेपार्ले येथील वेस्टर्न एक्स्प्रेस हायवेवर बॉम्बस्फोट |

## शहीद जवानांना येथे आले वीरमरण

| | |
|---|---|
| **ताज** | – राहुल शिंदे, मेजर संदीप उन्नीकृष्णन |
| **सीएसटी** | – शशांक शिंदे, एम. एल. चौधरी, अंबादास पवार, मुकेश जाधव |



अतिरेक्यांचा वेध घेताना एनएसजीचे कमांडो.

| | |
|---|---|
| **नरिमन हाऊस** | – एनएसजी कमांडो गजेंद्रसिंग |
| **कामा इस्पितळ** | – प्रकाश मोरे, विजय खांडेकर |
| **कामालेन** | – बापूराव धुरगुडे |
| **रंगभवन** | – हेमंत करकरे, विजय साळसकर, अशोक कामटे बळवंत भोसले, जयवंत पाटील, योगेश पाटील |
| **मेट्रो** | – अरुण चित्ते |
| **गिरगाव चौपाटी** | – तुकाराम ओंबळे |

**दोघा अतिरेक्यांनीच केले १५ जणांना शहीद**

अजमल कसाब व इस्माईल खान यांनी टप्प्याटप्प्याने प्रथम छत्रपती शिवाजी टर्मिनस, कामा इस्पितळ, कामा लेन, रंगभवन, मेट्रो व गिरगाव चौपाटी याठिकाणी केलेल्या हल्ल्यात १८ पैकी १५ पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना वीरमरण आले.

॥

झाले बहु, होतील बहु; परंतु यासम हाच

# हेमंत करकरे

**दहशतवाद** ही कुप्रवृत्ती आहे. कुप्रवृत्ती ज्यांच्या नसानसात भिनलेली आहे, अशा वृत्तीचे दहशतवादी मुळात माणसं नसतातच. ती जर माणसं असती तर दहशतीच्या विश्वात त्यांनी शिरकाव केला नसता. समाजाचे नुकसान करण्यातच ज्यांना अघोरी आनंद होतो ती माणसं कसली? जी माणसंच नाहीत ती जात, धर्म व पंथ यापैकी कोणत्याच छत्राखाली वावरण्याच्या योग्यतेची नसतात. कारण समाजाला ठेच पोहोचविण्याची शिकवण कोणतीच जात आणि कोणताच धर्म देत नसतो, म्हणून 'दहशतवाद्यांना धर्म नसतो' या निष्कर्षाप्रत पोहोचणाऱ्या, आदर्श पोलीस अधिकारी कसा असावा हे आपल्या कार्यप्रणालीद्वारे सिद्ध करून दाखविणाऱ्या आणि पारदर्शक कार्यपद्धतीचा आदर्श वस्तुपाठ साऱ्या जगासमोर मांडणाऱ्या शहीद हेमंत करकरे यांचे हौतात्म्य अवघ्या देशवासीयांना चटका लावून जाणारे आहे.

मुंबईच्या सहपोलीस आयुक्त (प्रशासन) या पदावर काम करताना तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी एकदा 'तुम्ही या पदावर समाधानी आहात का', असा प्रश्न केल्यावर 'या पदांतर्गत प्रशासकीय काम जरा जास्त आहे. मला फिल्डवर काम करण्याची इच्छा आहे. काहीतरी आव्हानात्मक काम हवे आहे', असा प्रस्ताव करकरे यांनी मांडला होता. करकरे यांच्या मागणीनुसार दि. २८ जानेवारी २००८ रोजी त्यांना



आदर्श पोलीस अधिकारी कसा असावा याचे
हेमंत करकरे हे एक उत्तम उदाहरण. अभ्यासूवृत्ती
आणि दूरदृष्टी लाभलेल्या करकरे यांनी पारदर्शक
कार्यपद्धतीद्वारे प्रगतीची शिखरे पादाक्रांत केली.
तरीदेखील त्यांचे पाय मात्र अखेरपर्यंत
मातीशीच नाते सांगत राहिले. झाले बहु,
होतील बहु; परंतु यासम हाच..

दहशतवादविरोधी पथकाचे प्रमुखपद देण्यात आले. करकरे यांनी उभ्या हयातीत विविध आघाड्यांवर काम करताना आपल्या कर्तृत्वाची मोहोर उमटविली होती. मात्र ते खऱ्या अर्थाने प्रसिद्धी झोतात आले ते मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाच्या नि:पक्षपाती तपासाच्या माध्यमातून. एटीएसप्रमुखपद स्वीकारल्यानंतर मालेगावात घडलेल्या स्फोट प्रकरणाचा तपास करकरे यांच्याकडे आला. जे प्रकरण हातात घेतले त्याचा सूक्ष्म अभ्यास करून त्याच्या मुळाशी पोहोचण्याची करकरेंकडे विलक्षण हातोटी होती. अवघ्या दहा महिन्यांच्या कालावधीत मालेगाव प्रकरणाशी निगडित पुरावे गोळा करून त्यांनी नि:पक्षपातीपणे छडा लावला होता. या प्रकरणात साध्वी प्रज्ञासिंह, लेफ्टनंट कर्नल पुरोहित व मेजर उपाध्याय यांचा सहभाग असल्याने त्यांना तात्काळ ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. त्यामुळे सर्वत्र खळबळ माजली. यावर उलटसुलट चर्चा रंगल्या, आरोप–प्रत्यारोपांचा सामनाही करकरे यांना करावा लागला. तरीही अविचल राहून करकरे यांनी आपले तपासकार्य अधिक जोमाने सुरूच ठेवले. नक्षलवादी आणि दहशतवाद्यांच्या फैरींना न जुमानणारे करकरे त्यांच्यावर होत असलेल्या आरोपांमुळे खचले नसले तरी काहीअंशी नैराश्य मात्र त्यांना जरुर आले होते. 'माझ्या कुटुंबावर असे आरोप एवढ्या मोठ्या माणसानी करावेत हीच जर आमची कमाई असेल तर आम्ही लढायचे आणि मरायचे कोणासाठी', असा प्रश्न त्यांच्या मनात उपस्थित झाला. एवढे होऊनही अत्यंत शांत, संयमी आणि अभ्यासूवृत्तीच्या करकरेंचे लढणे आणि मरणे मात्र अखेरपर्यंत सुरूच राहिले. संकटात न डगमगण्याची खंबीरता, तपासकार्यातील तटस्थता व धर्मनिरपेक्षता त्यांच्यात कोठून आली?

बालपणापासूनचेच ते अनुवंशिक संस्कार होते. मध्य प्रदेशात १ जुलै १९५४ रोजी जन्म झालेल्या करकरे यांचे वडील कमलाकर करकरे हे नागपूरच्या मध्य रेल्वेत कार्यरत होते तर आई कुमुदिनी करकरे ह्या नागपूरच्याच दीनानाथ विद्यालयात शिक्षिका म्हणून सेवारत होत्या. वडील रेल्वे युनियनचे नेते असल्याने जनसामान्यांच्या

**पोलीस अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना हेमंत करकरे.**



## *एकातरी दहशतवाद्याला जिवंत पकडा !*

*__मालेगाव__ बॉम्बस्फोटाचा अत्यंत काटेकोरपणे तपास करून हल्ल्यातील सहभागी व्यक्तींचा खरा चेहरा जगासमोर उघडा करताना करकरे यांच्या कार्यप्रणालीचे जेवढे कौतुक झाले, त्याहून कित्येक पटीने अधिक त्यांच्यावर वाट्टेल ती चिखलफेकही करण्यात आली. त्यांच्या अंतर्मनावर झालेल्या जखमांचे व्रण ताजे असतानाच मुंबईवर झालेल्या अतिरेकी हल्ल्याने पुन्हा ते घायाळ झाले. या हल्ल्यातील अतिरेकी नेमके कोण? घरचे की बाहेरचे? हल्लेखोरांचा सोक्षमोक्ष लावण्यासाठी त्यांना पुरावा हवा होता म्हणून ते प्राणपणाने या लढाईत उतरले. 'या हल्ल्यातील एका तरी दहशतवाद्याला जिवंत पकडा. पाकिस्तानला त्यांच्या या हल्ल्यामागील हात असल्याचे पुराव्यासकट दाखवून देण्याची वेळ आता आली आहे.' – असे करकरे आपल्या सहकाऱ्यांना सांगत होते. करकरे यांची इच्छा आदेश समजून या हल्ल्यातील एक दहशतवादी श्वापद धाडसी तुकाराम ओंबळे यांनी जीवाशी खेळून पकडूनही दिले; त्याची चौकशी करणारे करकरे मात्र आता या जगात नाहीत.*

प्रश्नांवर लढण्याचे बळ व खंबीरतेचे बाळकडू त्यांना वडिलांकडूनच मिळाले. घरातच आईरूपी गुरु लाभल्याने कोणत्याही विषयाच्या मुळाशी जाण्याची अभ्यासूवृत्ती, शांत व संयमीपणाची शिकवण त्या मातेकडूनच मिळाली.

शालेय आणि महाविद्यालयीन आयुष्यातच त्यांच्यात अभ्यासाची व वाचनाची गोडी निर्माण झाली होती. नागपूर येथील डॉ. विश्वेश्वरय्या रिजनल कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधून त्यांनी बी.ई. (मेकॅनिकल)ची पदवी प्रथम श्रेणीत संपादन केली. शिक्षणानंतर करकरे यांनी हिंदुस्थान लिव्हर व नॅशनल प्रॉडक्टिव्हीटी काऊन्सिलमध्ये उच्च पदावर काम केले. मात्र त्याक्षेत्रात त्यांचे मन रमले नाही. व्यक्तिमत्त्व विकासाचे धडे देणाऱ्या व 'केवळ बाह्यरूप म्हणजे व्यक्तिमत्त्व नव्हे, आतली सुंदरता म्हणजे व्यक्तिमत्त्व' मानणाऱ्या करकरेंना देशसेवा करण्याचे क्षेत्र खुणावत होते. त्यादृष्टीने त्यांनी पोलीस दलात जाण्याचा चंग मनाशी बांधला. ध्येय प्रत्यक्ष साकारण्यासाठी तयारी सुरू केली. अखेर त्यांनी घेतलेल्या परिश्रमांचे चीज झाले व हेमंत करकरे १९८२ साली आयपीएसची परीक्षा उत्तीर्ण झाले.

अडीच वर्षांच्या प्रशिक्षणकाळात परेडसाठी सरकारी वाहन वापरता येणार नाही, अशी अडवणुकीची भूमिका एका विक्षिप्त अधिकाऱ्याने घेतल्याने करकरे यांना मनोमन यातना झाल्या होत्या. प्रशिक्षणानंतर १९८५ साली करकरे यांची भुसावळ (जि. जळगाव) येथे सहाय्यक पोलीस अधीक्षक या पदावर नेमणूक झाली. त्याठिकाणी

त्यांनी आपले कर्तव्य चोखपणे तर बजावलेच; शिवाय जनसामान्यांमध्ये स्वत:विषयी आदरयुक्त भीतीही निर्माण केली. त्याठिकाणी त्यांनी स्वत:चा एक गोतावळा तयार केला होता. भुसावळनंतर नांदेड, अकोला, ठाणे, भिवंडी, चंद्रपूर आणि मुंबई येथे कर्तव्याची छाप पाडली. चंद्रपूरचे जिल्हा अधीक्षक असताना करकरे 'शुगर' या सांकेतिक नावाने ओळखले जात. चंद्रपूरच्या पहाडावर नक्षली दहशतवाद्यांचे टोळके दबा धरून बसल्याची माहिती करकरे यांना मिळाली होती. दहशतवाद्यांचा शोध सुरू असताना 'तू मला काझीन झाकीसचे पुस्तक देणार होता ना', असा सवाल करकरे वाहनातील एका पत्रकाराला करतात. यावरून त्यांच्या चौफेर वाचनाच्या आवडीची प्रचिती येते. चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्यातील नक्षली चळवळीचे कंबरडे मोडण्याचे श्रेय आजही करकरे यांनाच दिले जाते. सुरुवातीला करकरे यांची मुंबईच्या पोलीस उपायुक्तपदी नेमणूक झाली होती. त्यानंतर रिसर्च अ‍ॅण्ड अ‍ॅनालिसीस विंग (रॉ) या देशाच्या सर्वोच्च अशा आंतरराष्ट्रीय गुप्तचर संस्थेत त्यांची नियुक्ती झाली. संयुक्त राष्ट्रसंघातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. तहान-भूक विसरून काम करणाऱ्या उमद्या व देखण्या अधिकाऱ्याकडे दहशतवादविरोधी पथकाचे प्रमुखपद उशिराच आले. पण त्याविषयी त्यांनी कधी खंत बाळगली नाही. असा अन्याय अनेकांवर झाल्याचे आणि आपणदेखील त्यातीलच एक असल्याचे करकरे म्हणायचे.

नोकरीत स्थिरस्थावर झाल्यानंतर करकरे यांचा विवाह पूर्वाश्रमीच्या ज्योत्स्ना व आताच्या कविता या सुसंस्कृत कुटुंबातील सुशिक्षित, समंजस व बुद्धिजीवी असलेल्या युवतीशी झाला. त्यांच्या संसारवेलीवर जुही, सायली व आकाश या तीन कळ्या उमलल्या. या तीनही मुलांवर संस्कार करताना चांगुलपणाची आदर्श शिकवणही त्यांना दिली. ज्येष्ठ कन्या जुही विवाहित असून, सध्या ती अमेरिकेत सॉफ्टवेअर इंजिनिअर आहे तर सायलीने लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून ग्रॅज्युएशन पूर्ण केले आहे. धाकटा मुलगा आकाश बारावी उत्तीर्ण असून त्याला सीए व एमबीए करायचे असून त्यादृष्टीने त्याचा प्रवास सुरू आहे. समंजस व परिपक्व कुटुंब असल्याने साऱ्यांचेच परस्परांशी सूर चांगले जुळायचे. मात्र असे असतानादेखील त्यांनी त्यांचा ताण-तणाव कुटुंबाशी कधी शेअर केला नाही. त्यांचा लढा ते स्वत:च लढत राहिले.

### २६ नोव्हेंबर : दिवस एक, घाव दोन


मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाचा तपास अचूक पद्धतीने करून तो पूर्णत्वाकडे नेणाऱ्या करकरे यांच्यावर हिंदुत्ववादी विचारांचे नेते व विविध क्षेत्रांतील मंडळी तोंडसुख घेत होती. संशयितांचे जवाब घेताना त्यांच्यावर अत्याचार होत असल्याचे तसेच मालेगाव या मुस्लीमबहुल शहरातील स्फोटामागे हिंदू दहशतवादी असल्याचे उघडपणे बोलले जात होते. त्यामुळे संतप्त होऊन 'सामना' या शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या दैनिकाच्या दि. २६ नोव्हेंबर २००८ रोजीच्या अंकात मालेगाव स्फोट प्रकरणाचा तपास करणाऱ्या एटीएसप्रमुख करकरे व त्यांच्या सहकाऱ्यांवर अग्रलेखाच्या माध्यमातून जहाल शब्दात टीका करण्यात आली होती. मालेगाव प्रकरणाची तटस्थपणे चौकशी करणारे करकरे व सौ. कविता करकरे 'सामना'च्या शब्दास्त्रांनी घायाळ झाले होते. दिवसभर करकरे कुटुंबीय अस्वस्थ होते. त्यांची भावना त्यांनी राज्याचे पोलीस महासंचालक अनामी रॉय यांच्याकडे बोलून दाखविली व त्याचदिवशी गृहमंत्री आर. आर. पाटील यांच्याकडे त्यांनी भेटीची वेळ मागितली.

## सर्वधर्मसमभावाच्या संस्कारांची गरज : कविता करकरे

**मालेगाव** बॉम्बस्फोट प्रकरणाचा नि:पक्षपातीपणे तपास करताना एका निष्कर्षाप्रत पोहोचल्यावर हेमंत करकरे यांची अवस्था अर्जुनासारखी झाली होती. वास्तविक महाभारतातील गोंधळलेल्या अवस्थेतील अर्जुनाला 'बाण नेमका कोणावर मारावा' हे कोडे सोडविण्यासाठी श्रीकृष्णाची मदत लागली. मात्र करकरे यांना कोणत्याच श्रीकृष्णाची मदत लागली नाही, कारण श्रीकृष्ण त्यांच्या मनामनात वसलेला होता, बालपणी झालेल्या संस्कारात दडलेला होता. म्हणूनच ते मालेगाव प्रकरणाच्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचू शकले. तो सर्वधर्मसमभावाचा संस्कार माझ्यातही आहे आणि माझ्या पतीतही होता. आज अशाच सर्वधर्मसमभावाचे संस्कार घराघरांतून होण्याची गरज वीरपत्नी कविता करकरे यांनी प्रतिपादीत केली.

माझे पती शहीद झाल्यापासून मला ज्या ज्या ठिकाणी संधी मिळत आहे, त्या त्या ठिकाणी मी हे संस्कार रूजविण्याचे काम करीत आहे. हे काम समाजाला माझ्या कृतीतून दिसून येईलच. कारण मी बाहेरून कितीही दु:ख लपविण्याचा प्रयत्न केला तरी माझ्या मनात आज एकप्रकारची पोकळी निर्माण झालेली आहे... आमच्या घरातील ऊब निघून गेलेली आहे...घरपण निघून गेलेलं आहे, अशा अवस्थेत कोणी कितीही मदतीसाठी पुढे आले तरी माझा माणूस कोणी परत आणून देईल का? हा खरा मनाला क्षणोक्षणी कुरतडणारा सवाल आहे. त्यासाठी मनातील पोकळी मला या कामातून भरून काढायची आहे. खरेतर सर्वधर्मसमभावाचे व भ्रष्टाचार विरोधी संस्कार घराघरातून व्हायला हवेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.





हेल्मेट परिधान करताना हेमंत करकरे.

“

## ’मी देशाची आभारी आहे’

*‘२६/११’च्या काळरात्री अतिरेक्यांच्या हल्ल्यात करकरे कुटुंबीयांनी काय गमावले, त्याचे दु:ख मी शब्दात व्यक्त करणे अशक्य आहे. परंतु आपल्या देशाच्या मुळावर उठलेल्या आतंकवादाचा सामना करण्याचे धाडस, शक्ती आपणा साऱ्यांजवळ असायलाच हवी. असे झाले तरच देशासाठी लढता–लढता बलिदानाच्या वेदीवर चढून गेलेल्या शहिदांच्या आत्म्याला शांती लाभू शकेल. मुंबईवर झालेल्या अतिरेकी हल्ल्यानंतर दु:ख पचविण्याचे जे बळ लागते, जो आधार लागतो तो देशवासीयांनी दिल्याबद्दल मी देशाची आभारी आहे.’*

– अशा शब्दात दहशतवादविरोधी पथकाचे प्रमुख शहीद हेमंत करकरे यांची अमेरिकास्थित विवाहित ज्येष्ठ कन्या जुही हिने आपल्या भावना व्यक्त केल्या.

”

## ‘चित्रकुट‘वर भेट

अनामी रॉय यांच्यासोबत करकरे यांनी रात्री ८.३५ वाजेच्या सुमारास गृहमंत्र्यांची भेट घेतली व मनातील अस्वस्थता त्यांच्याकडे व्यक्त केली. मालेगाव प्रकरणाचा तपास प्रामाणिकपणे करूनही नेतेमंडळींकडून माझ्यावर बेछुट आरोप होत आहेत. ‘या तपासासाठी मी योग्य वाटत नसेल तर मला या पदावरून हटवून दुसऱ्या कोणाही व्यक्तीकडे ही जबाबदारी सोपवा‘ – करकरे पोटतिडकीने गृहमंत्र्यांजवळ बोलत होते. करकरे यांची भावना लक्षात घेऊन ‘तुमचा तपास योग्य दिशेने सुरू असून, तो अशाच पद्धतीने सुरू ठेवा. आरोपांकडे लक्ष देऊ नका, मी तुमच्या पाठीशी आहे‘, अशी आश्वासक थाप गृहमंत्री पाटील यांनी करकरे यांच्या पाठीवर मारली. सुमारे तासभर चाललेल्या बैठकीमुळे करकरे यांची अस्वस्थता काहीअंशी कमी झाली व नैराश्यही लोप पावले. गृहमंत्र्यांनी दाखविलेल्या विश्वासामुळे तेथून परतताना त्यांच्या चेहऱ्यावर आनंद विलसत होता. गृहमंत्र्यांसोबतची बैठक संपण्याच्या पाचव्या मिनिटाला अतिरेक्यांनी मुंबईवर हल्ला चढविलेला असतो.

घटना कानावर पडताच करकरे तात्काळ शिवाजी टर्मिनसच्या दिशेने रवाना झाले. मनात विचारांचे काहूर माजलेले होते. साडेदहा वाजेच्या सुमारास ते शिवाजी टर्मिनसला पोहोचले. तोच त्याठिकाणी रेल्वेचे प्रमुख के. पी. रघुवंशी येऊन त्यांना भेटले. त्यांच्यापाठोपाठ पोलीस उपायुक्त वसंत कोरेगावकर व संजय मोहिते पोहोचले. तोपर्यंत शिवाजी टर्मिनसवर अजमल कसाब व इस्माईल खान या दोन अतिरेक्यांनी अंदाधुंद गोळीबार करीत रेल्वेस्थानकाला स्मशानभूमीचे रूप देऊन ते तेथून पसार झाले होते. दरम्यान, सर्व अधिकारी एकत्र येऊन नियोजन करतात तोच टाइम्स गल्लीतून फायरिंग झाल्याचा आवाज त्यांच्या कानावर येतो. अधिकारीवर्ग दबक्या पावलांनी टाइम्स गल्लीच्या दिशेने निघतात. टाइम्स गल्लीत पोहोचल्यानंतर कोरेगावकराना करकरे शिवाजी टर्मिनसकडे जायला सांगतात. रघुवंशी हेसुद्धा शिवाजी टर्मिनसकडे रवाना होतात, तर करकरे आणि मोहिते टाइम्स गल्लीकडे आगेकूच करतात. खंडणीविरोधी पथकाचे प्रमुख विजय साळसकर व पूर्व विभागाचे अतिरिक्त पोलीस आयुक्त अशोक कामटे करकरेंना येऊन मिळतात. तेथून ते कामा रुग्णालयाकडे जाण्याच्या तयारीत असतात तोच पायधुनी विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त एस. ए. भामरे यांचे वाहन त्याठिकाणी पोहोचते. ते वाहन थांबवून साळसकरांनी स्टेअरिंग आपल्या ताब्यात घेतली. त्यांच्याशेजारी करकरे व कामटे बसले. पाठीमागे बळवंत भोसले, जयवंत पाटील, योगेश पाटील व अरुण जाधव बसले. पायधुनी विभागाचे भामरे यांना त्याचठिकाणी थांबावयास सांगून गाडी रंगभवनच्या दिशेने पुढे निघाली. त्याच सुमारास कामा इस्पितळात गोळीबार व ग्रेनेडचा हल्ला करून खाली आलेले कसाब व इस्माईल शहरात जाण्यासाठी एखाद्या वाहनाच्या प्रतीक्षेत रंगभवन येथील एटीएम सेंटरसमोरच्या झुडपाजवळ दबा धरून बसले होते. तेवढ्यात समोरून एक पोलीस वाहन येताना दिसल्याने ते सावध झाले. रंगभवनच्या झुडपाजवळ काहीतरी हालचाल होत असल्याचा संशय साळसकर व कामटे यांना आला. त्याचक्षणी साळसकर यांचा पाय ब्रेकवर पडला. त्यांनी झुडपाच्या दिशेने गोळीबार केला. त्यातील एक गोळी कसाबच्या हाताला लागली. त्यानंतर कामटे यांनी झाडलेली गोळी कसाबच्या त्याच जखमी हाताला लागताच त्याच्या हातातील एके–

## सहिष्णू कुटूंब

***शहिदांच्या*** *वीरमरणानंतर भावनावश होऊन 'कसाबला फासावर लटकवायला हवे, त्यास जाहीर फाशी द्यायला हवी', असा सार्‍यांनाच अपेक्षित असलेला सात्त्विक संताप प्रसिद्धि – माध्यमांसमोर व्यक्त होत असताना करकरे यांच्या कन्येने मात्र कमालीच्या परिपक्वतेचे व उदात्त विचारांचे दर्शन घडविले. उपरोक्त विधानांच्या विरोधात जाऊन पित्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या 'अजमल कसाबला सुधारण्याची संधी द्यावी', असे विधान करून सर्वांच्याच भुवया तिने उंचावून टाकल्या. कन्येच्या विधानावरून करकरे कुटुंबीय किती संयमी, सहिष्णू व मानवतावादी विचारांचे आहे, याची प्रचिती आल्यावाचून राहत नाही. कसाब एकवीस वर्षांचा आहे. त्याला धर्मांध बनविले आहे. धर्माचा खरा अर्थ त्याला समजून सांगायला हवा. धर्म म्हणजे आनंदी राहणं आहे. दुसर्‍यांशी चांगले वागूनच माणसाला आनंदी राहता येतं. कोणताही धर्म दुसर्‍यांशी वाईट वागा, दुसर्‍यांना मारा असं शिकवत नाही. तर दया, क्षमा, शांती, प्रेम, अमन हेच कोणताही धर्म शिकवतो. हेच संस्कार आमच्यावर झाले असल्याने माझी मुलगी जुही हेच सांगण्याचा प्रयत्न करीत असल्याचे कविता करकरे नमूद करतात.*

५६ रायफल खाली पडली. कसाब जखमी झाल्याचे पाहताच इस्माईलने गाडीच्या समोर येऊन बेछुट गोळीबार केला. स्वयंचलित रायफलीतून निघालेल्या गोळ्यांनी वाहनात बसलेल्या तिघा जिगरबाज अधिकार्‍यांसह पाठीमागे बसलेल्या तिघा पोलीस कर्मचार्‍यांच्या शरीराची चाळण झाली. अंगात बुलेटप्रूफ जॅकेट असल्यामुळे करकरे, कामटे व साळसकर यांना खाली वाकून स्वत:चा बचाव करता आला नाही. मुंबईवरील हल्ल्याला परतावून लावण्याच्या इराद्याने व अतिरेक्यांना कंठस्नान घालण्याच्या जिद्दीने मोहिमेवर निघालेले भारतमातेचे तिन्ही सुपुत्र साळसकर, करकरे व कामटे अतिरेक्यांच्या तुफानी हल्ल्यात शहीद झाले. त्यांच्यासमवेत असलेल्या बळवंत भोसले, जयवंत पाटील व योगेश पाटील यांनाही याचवेळी वीरमरण आले. मोठ्या हुद्या–वर असलेले तीन ज्येष्ठ पोलीस अधिकारी व तीन कर्मचारी एकाचवेळी शहीद होण्याची दुर्घटना पहिल्यांदाच घडली होती. याच वाहनात पाठीमागे बसलेले पोलीस कर्मचारी अरुण जाधव केवळ जखमी झाले होते.

गाडीत बसलेल्या पोलीस अधिकार्‍यांकडून प्रतिकार थांबल्याची खात्री करून कसाब व इस्माईल वाहनाच्या दिशेने पुढे सरसावले. त्यांनी करकरे, साळसकर व कामटे यांचे मृतदेह गाडीबाहेर काढून रस्त्यावर टाकले व मागील सीटवर असलेल्या मृत पोलीस कर्मचार्‍यांना वाहनातच ठेवून पलायन केले. अतिरेक्यांशी लढताना वीरमरण आलेल्या लढवय्ये करकरे, साळसकर व कामटे यांना तात्काळ उपचाराविना घटनास्थळी सुमारे तासभर पडून राहावे लागले. अंगावर गोळ्या झेलूनही काही काळ विजय साळसकर यांच्या श्वासात धुगधुगी सुरू होती. तात्काळ उपचार मिळाले असते तर कदाचित त्यांना जीवदान लाभले असते. दुर्दैवाने देशाच्या तीनही शूर शिपायांच्या वाट्याला वीरमरणानंतरही उपेक्षाच आली.



शहीद करकरे यांच्या अखेरच्या प्रवासात सहभागी झालेले नागरिक.

**सच्चा देशाभिमानी अधिकारी**

वरकरणी शांत, संयमी व धीरगंभीर वाटणारे करकरे कर्तव्यात अत्यंत दक्ष, प्रसंगी कठोर व न्यायप्रिय होते. कोणाच्या ध्यानीमनी नसताना अतिरेक्यांच्या भ्याड हल्ल्यात करकरे यांना वीरमरण आल्याने पोलीस यंत्रणेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. देशावर व पोलीस दलावर जीव ओवाळून तसेच स्वत:ला झोकून देऊन काम करणारा सच्चा देशाभिमानी अधिकारी त्या काळरात्री गमावला होता. त्यांच्या बलिदानाचे वृत्त कानी पडताच जो तो हळहळताना दिसत होता.

**युरोपियन बंगल्यावर दु:खाची छाया**

उपमुख्यमंत्र्यांना भेटून लवकर येतो, असे पत्नी कविताला सांगून हेमंत करकरे हसत हसत बाहेर पडले. मात्र येताना ते चिरनिद्राधीन होऊन परततील असे कोणालाच वाटले नव्हते. एक धाडसी व अभ्यासू अधिकारी दहशतवादविरोधी कारवाईत शहीद झाल्याचे वृत्त हिंदू कॉलनीत येऊन धडकताच परिसरात शुकशुकाट झाला. दादर पूर्व येथील टिळक ब्रीजजवळ असणाऱ्या हिंदू कॉलनीतील ५५ ए/२ या निवासस्थानावर दु:खाची छायाच पसरली. पत्नी कविता व पुत्र आकाशने हंबरडाच फोडला. आपल्या पश्चात असे काही अकल्पित घडेल असे स्वप्नातही वाटत नसताना बाबांचा मृत्यू दोन्ही जुही व सायली यांना चटका लावण्यासारखाच होता.

घरात सुमारे वीस मिनिटे पार्थिव ठेवल्यानंतर सकाळी ८.२० मिनिटांनी निवासस्थानाच्या बाहेर तयार केलेल्या मंचावर त्यांचे पार्थिव दर्शनासाठी ठेवण्यात आले. राज्यपाल एस. सी. जमीर यांच्यासह राज्याचे महसूलमंत्री नारायण राणे, नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे, खासदार सुरेश प्रभू, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष नितीन



## ...तर आज ही वेळ आली नसती

***देशाची*** *आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला भविष्यात सागरी मार्गाने धोका असल्याची जाणीव मुंबई पोलिसांना आधीच होती. तो धोका ओळखून मुंबईत एक सागरी पोलीस ठाणे व सात पोलीस चौक्या बनविण्यात याव्यात, असा प्रस्ताव हेमंत करकरे यांनी अतिरेकी हल्ल्याच्या दोन वर्षे आधी प्रशासन विभागाचे सहआयुक्त असताना शासनाकडे पाठविला होता. या प्रस्तावात सागरी मार्गावरील धोके ओळखून एक सागरी पोलीस ठाणे व सात चौक्या उभारून त्यांना अत्याधुनिक शस्त्र, दुबिर्णी व नौका पुरविण्यात याव्यात असे सुचविले होते. करकरे यांच्या प्रत्येक प्रस्तावामागे काही ना काही अर्थ दडलेला असायचा. दूरदृष्टी, कल्पकता व अभ्यासू असलेल्या करकरे यांनी बनविलेले बहुतांश प्रस्ताव मंजूर झाले. काही कार्यान्वितही झाले. मात्र सागरी पोलीस ठाण्याचा प्रस्ताव निधीअभावी मार्गी लागला नाही. त्यामुळे शासनाला, शहिदांना व बळी पडलेल्या निरपराध लोकांना किंमत मोजावी लागली. करकरे यांच्या प्रस्तावानुसार कार्यवाही झाली असती तर मुंबईवर आज ही वेळ आली नसती.*

गडकरी, विधानसभेतील भाजपाचे गटनेते एकनाथ खडसे, आमदार विनोद तावडे, जितेंद्र आव्हाड, आमदार बाळा नांदगावकर, आमदार मुझफ्फर हुसेन, सचिन अहिर, गोपाळ शेट्टी, मंगलप्रभात लोढा, पोलीस सहआयुक्त के. एल. प्रसाद यांनी करकरे यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र वाहून श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी, नातेवाईक, स्थानिक रहिवाशांनी पार्थिवाचे दर्शन घेतले. पोलिसांनी मानवंदना दिल्यानंतर नियोजित वेळेप्रमाणे दहा वाजता त्यांच्या अंत्ययात्रेला सुरुवात झाली. फुलांनी सजविलेल्या ट्रकवर त्यांचे तिरंग्यामध्ये लपेटलेले पार्थिव वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वत: खांदा देत ट्रकवर ठेवले. त्यावेळी उपस्थितांमधील अनेकांना अश्रू आवरता आले नाहीत. 'हेमंत करकरे अमर रहे..' अशा घोषणा देत अंत्ययात्रा टिळक ब्रीजवरून शिवाजी पार्ककडे सरकू लागली. अनेक मान्यवर, पोलीस खात्यातील कर्मचाऱ्यांसह सर्वजण करकरेंच्या अनेक आठवणींना उजाळा देत मार्गक्रमण करीत होते.

अंत्ययात्रेत लाखोंचा जनसमुदाय सहभागी झाला होता. शोकाकुल वातावरणात निघालेल्या अंत्ययात्रेत टाचणीचाही आवाज यावा एवढी शांतता होती. निवासस्थानापासून टिळक पुलावरून प्लाझा सिनेमाजवळ अंत्ययात्रा येताच स्थानिकांनी त्यांच्यावर पुष्पवृष्टी केली. पुन्हा जोरदार घोषणा देण्यात आल्या. याच मार्गावर त्यांना श्रद्धांजली वाहणारी विविध फलकही लावण्यात आले होते. एन.सी. केळकर मार्गावरून ही अंत्ययात्रा पुढे शिवाजी मंदिरसमोरून शिवसेना भवनकडून शिवाजी पार्ककडे पुढे सरकत होती. रस्त्याच्या दुतर्फा माणसे उभी होती. तरुण मुली, स्त्रिया यांना अश्रू आवरता येत नव्हते. करकरे यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यासाठी लहान मुलेही आपल्या हातात फुले घेऊन उभी होती. राज ठाकरे यांच्या निवासस्थानाजवळ जेव्हा अंत्ययात्रा आली तेव्हा राज यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे आणि नाट्यनिर्माते मोहन वाघ आदिंनी फुले वाहिली. त्यानंतर अंत्ययात्रा स्वातंत्र्यवीर सावरकर मार्गावरून दादरच्या स्मशानभूमीपर्यंत साडेअकरा वाजता पोहोचली. रस्त्याच्या दुतर्फा अंत्यदर्शनासाठी हजारो नागरिकांची रिघ लागली होती. इमारतींच्या खिडक्या, बाल्कनीमधूनही महिला अश्रू ढाळत होत्या. अंत्ययात्रा स्मशानभूमीजवळ येताच पुन्हा जोरदार घोषणा देण्यात आल्या. विशेष म्हणजे अंत्ययात्रेत तरुणवर्ग मोठ्या संख्येने सहभागी होता.

सर्व क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत शिवाजी पार्क स्मशानभूमीत जनतेच्या प्रेमास पात्र ठरलेल्या करकरे यांना साश्रूपूर्ण नयनांनी अखेरचा निरोप देण्यात आला. पित्याच्या पार्थिवास पुत्र आकाशने अग्निडाग दिला. बराच वेळ धीरगंभीर बनलेल्या वातावरणात 'शहीद हेमंत करकरे अमर रहे'चा नारा घुमताच आसमंत दणाणून गेला. शहीद करकरे यांच्या रूपाने एक कर्तृत्ववान पर्व अनंतात विलीन झाले होते... अवघ्या देशवासीयांना अभिमानास्पद वाटेल अशी कामगिरी करून... त्यांच्यावर आरोप–प्रत्यारोपाच्या फैरी झाडणाऱ्यांच्या श्रीमुखात सणसणीत चपराक मारून... पोलीस दलासाठी एक प्रेरणादायी इतिहास मागे सारून...

॥



घरादारापेक्षा आणि पत्नी व एकुलत्या एक कन्येपेक्षाही कर्तव्याला उजवे माप देणारे विजय साळसकर आज लढता लढता बलिदानाच्या वेदीवर चढून गेलेले असले तरी त्यांनी अपार कष्टाने उभा केलेला गौरवांकीत इतिहास खुद्द इतिहासालाही विसरणे अशक्य आहे.

## गुन्हेगारांचा कर्दनकाळ

# विजय साळसकर

'**जनतेचा** रक्षक' या कसोटीला उतरणारा, आपल्या अजोड कर्तृत्वाच्या बळावर प्रसंगी तहान–भूक विसरून पोलीस खात्यात शून्यातून विश्व निर्माण करणारा, प्रगतीची विविध शिखरं पादाक्रांत करूनही पाय जमिनीवरच ठेवून मातीशी आपले अतूट नातं सांगणारा पोलीस अधिकारी कसा असावा? याचे एक उत्तर विजय साळसकर हेच असू शकते. घरा–दारापेक्षाही आणि पत्नी व कन्येपेक्षाही कर्तव्याला उजवे माप देणारे साळसकर आज लढता–लढता बलिदानाच्या वेदीवर चढून गेलेले असले तरी त्यांनी अपार कष्टाने उभा केलेला त्यांचा इतिहास खुद्द इतिहासालाही विसरणे अशक्य आहे. त्यांनी प्रामाणिकणाच्या आणि मेहनतीच्या बळावर निर्माण केलेली आदर्श पायवाट पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी सदैव मार्गदर्शक आणि प्रेरणादायीच ठरेल यात तीळमात्र शंका नाही.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एडगाव (ता.वैभववाडी) येथे दि. ५ एप्रिल १९५७ रोजी सहदेव साळसकर व हेमलता साळसकर यांच्या घरात विजय नावाच्या सुपुत्राचा जन्म

## *काय चाललंय काय हे?*

*__कर्तव्याशी__ प्रामाणिक राहताना आपले सर्वस्व पणाला लावणाऱ्या जिगरबाज अधिकाऱ्याचा मला कायम गर्वच वाटत राहील व शहीद अधिकाऱ्याची वीरपत्नी म्हणून स्वतःचाही अभिमानच वाटत राहील. जीवावर उदार होऊन अतिरेक्यांशी लढताना वीरमरण आलेले माझे पती त्यांच्या अजोड कर्तृत्वामुळे खऱ्या अर्थाने अमर झाले असून, त्यांची कीर्ती सातासमुद्रापार सर्वदूर पोहोचली आहे. ते आज आमच्यात नाही असे मन आजही मानायला तयार नाही. ते आजही आमच्यातच आहेत त्यांच्या आठवणींच्या रूपाने, त्यांच्या अविस्मरणीय कर्तृत्वाच्या रूपाने. पण खंत एका गोष्टीची वाटते की, आपल्या संसदेवर हल्ला झाला, मुंबईत रेल्वेत बॉम्बस्फोट झाला तरी त्या घटनांमधून बोध घेऊन आपल्याला शहाणे होता आले नाही. कोठून कोठून लोक सीमा पार करून आपल्या देशात येतात. काहीही कारण नसताना चुटकीसरशी निरपराध लोकांच्या जीवाशी खेळतात... काय चाललंय काय हे, शहीद साळसकरांची वीरपत्नी स्मिता साळसकर जेव्हा हा प्रश्न उपस्थित करतात, तेव्हा आपल्या देशाची संरक्षण यंत्रणा किती नपुंसक आणि कुचकामी झाली आहे याची जाणीव होते.*

झाला. आपला पुत्र मोठा होऊन ज्या गोष्टीला हात लावील त्याचे सोने करून 'विजय' संपादन करेल याची पुसटशी कल्पनादेखील साळसकर दांपत्याला नव्हती. तरी त्यांनी पुत्राचे नाव ठेवले होते विजय. लहान दिलीप व एकुलती एक कन्या हर्षाली असा पाच जणांचा हा परिवार होता. बालपणापासून धाडसी, चपळ व बुद्धिमान असलेल्या विजय साळसकर यांच्यात इतरांपेक्षा वेगळे काहीतरी करण्याची लक्षणे दिसायची. शालेय व माध्यमिक शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी मुंबई विद्यापीठातून एम.कॉमची पदवी संपादन केली.

### शाखाप्रमुख ते पोलीस निरीक्षक

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरीची वाट पाहण्यात वेळ दवडण्याऐवजी सामाजिक कार्य करण्याच्या हेतूने साळसकर यांनी मालवण येथे शिवसेनेत सक्रिय होऊन काम सुरू केले. त्यांची पक्षावर असलेली निष्ठा व त्यांच्यात असलेले नेतृत्व गुण हेरून पक्षश्रेष्ठींनी त्यांच्याकडे मालवण येथील शाखाप्रमुखाची जबाबदारी सोपवली. ती जबाबदारी साळसकर यांनी दोन वर्षे उत्कृष्टपणे सांभाळून परिसरात शिवसेनेचा एक

निष्ठावान व सेवाभावी कार्यकर्ता म्हणून स्वत:ची छाप पाडली. त्यानंतर काही काळ एका राष्ट्रीयीकृत बँकेत नोकरी केली. एखाद्या कार्यालयात बसून नुसती पोटार्थी कर्मचारी/अधिकाऱ्याची नोकरी करणे त्यांना पसंत नव्हते. आपण समाजाचे काही देणे लागतो, त्या समाजाच्या ऋणातून उतराई होण्याच्या दृष्टीने त्यांना ठोस असे कार्य करून स्वत:चा वेगळा ठसा उमटवायचा होता. साळसकर ज्या संधीची वाट पाहत होते अखेर ती संधी त्यांच्याकडे चालून आली. सन १९८३ मध्ये ते पोलीस दलात सहभागी झाले. त्यांची पहिली पोस्टिंग मालाड येथील पोलीस ठाण्यात झाली. सुरुवातीला त्यांनी पोलीस दलातील बारकाव्यांचा सूक्ष्मपणे अभ्यास केला. त्यानंतर आपल्या कामाची चुणूक दाखवायला सुरुवात केली. अंधेरीच्या एमआयडीसी पोलीस ठाण्यात उपनिरीक्षक म्हणून काम करताना साळसकरांनी एकामागून एक गुन्हे उघडकीस आणण्याचा सपाटाच सुरू केला. गुन्ह्याचा तपास करण्याची त्यांची स्वत:ची एक विशिष्ट शैली होती. खबऱ्यांची यंत्रणा राबवून अनेक गुन्हे नियंत्रणात आणण्याचा त्यांनी पुरेपूर प्रयत्न केला.

सर्वसामान्यांचे रक्षण करताना त्यांना न्याय मिळवून देत असताना अपराध आणि अपराध्याबद्दल त्यांच्या मनात प्रचंड चीड होती. अरुण गवळी, छोटा राजन असो की दाऊद टोळी या साऱ्यांनाच आवर घालण्याचा त्यांनी जणू विडाच उचलला होता. त्यामुळेच गुन्हेगारी जगतात त्यांच्या नावाचा दबदबा वाढत चालला होता. साळसकरांनी ठरवले असते तर खाकी वर्दीशी बेईमानी करून नोकरी सरकारची व चाकरी गुंडांची करून कोट्यधीश होता आले असते. पण त्यांना हे दाखवून द्यायचे होते की, सर्वच अधिकारी विकावू प्रवृत्तीचे नसतात, सर्वच अधिकारी जनतेच्या भावनांशी आणि जीवाशी खेळणारे नसतात. खाकीवर निष्ठा व कर्तव्यावर श्रद्धा ठेवून तत्त्वे अंगाशी कवटाळून प्रसंगी जीवाची बाजी लावणारे जाँबाज अधिकारीही असतात. तासन्‌तास ड्यूटी करूनही थकव्याचा मागमूस चेहऱ्यावर दिसू न देणाऱ्या या अधिकाऱ्याच्या रहस्यमय चेहऱ्यावर कायम कोणत्या ना कोणत्या तरी गुन्ह्याच्या तपासकार्याची चिंता आणि जिद्द दिसायची. अनेकदा असे आढळून येते की गुन्हेगारांचा तपास करता करता काही अधिकारी स्वत:तील संवेदनशीलता हरवून स्वत:देखील गुन्हेगारांसारखेच सर्वसामान्यांशी वागू लागतात. मात्र, साळसकर यास अपवाद होते. कठोर मनाच्या या अधिकाऱ्यात एक मृदू मनाचा माणूसदेखील नांदत होता. त्यांनी आपल्यातील संवेदना कधीच बोथट होऊ दिल्या नव्हत्या. हे सारे जपताना स्वाभिमान, प्रामाणिकपणा व कर्तव्यावरील निष्ठा त्यांनी जरादेखील ढळू दिलेली नव्हती. वरिष्ठांची मिंदेगिरी करून प्रमोशनच्या पायऱ्या चढण्यापेक्षा स्वत:ला कर्तृत्वातून सिद्ध करीत त्यांच्यात पुढे यायची जिद्द होती.

साळसकरांची कार्यपद्धती पाहून त्यांची नियुक्ती अंमली पदार्थविरोधी पथकात व पुढे १९९२ मध्ये हत्यारी विभागात करण्यात आली. सन २००१ मध्ये ते गुन्हे अन्वेषण विभागात दाखल झाले. या विभागात दाखल होताच त्यांनी अनेक गुन्हे उघडकीस

आणले. याच कालावधीत त्यांनी अंडरवर्ल्डमधील अरुण गवळी, छोटा राजन, अमर नाईक व दाऊद टोळीतील अनेक गँगस्टर्स व गुंडांना कंठस्नान घातले. त्यापैकी अमर नाईक ऊर्फ रावण, गवळी टोळीतील सदामामा पावले – विजय तांडेल, गणेश भोसले ऊर्फ वकील, राजन टोळीचा जग्गू शेट्टी, सुशील गावकर, साधू शेट्टी या खतरनाक गँगस्टर्सचे एन्काऊंटर विशेष गाजले होते. यातील जग्गू शेट्टी व सुशील गावकर यांचा एन्काऊंटर साळसकर व त्यांच्या पथकाने बंगळुरूमध्ये केला होता. या कामगिरीमुळे कर्नाटक सरकारने या पथकाला एक लाखाचे बक्षीस दिले होते. गवळी टोळीविरोधात उघडलेल्या मोहिमेमुळे खुद्द अरुण गवळीलादेखील साळसकरांचे नाव ऐकताच घाम फुटायचा. गुटखाकिंग रसिक धारीवाल व जे. एम. जोशी यांनी आपसातला वाद मिटविण्याच्या बदल्यात डी कंपनीला गुटख्याची पाकिटे पॅक करण्याची यंत्रे दिल्याचे प्रकरण साळसकर यांनीच उघडकीस आणले होते.

साळसकर यांची गुंडांमध्ये जरब निर्माण करणारी कारकीर्द लक्षात घेऊनच त्यांची खंडणीविरोधी पथकाच्या प्रमुखपदी नेमणूक करण्यात आली होती. विविध उद्योग व्यवसायात प्रगतीची शिखरे काबीज करणाऱ्या उद्योजकांना अवास्तव खंडणी मागून विविध टोळ्यांकडून ब्लॅकमेल करण्याचे प्रमाण कमालीचे वाढले होते. गुंडांच्या टोळ्यांपुढे खंडणी देऊनसुद्धा जीव सुरक्षित राहीलच याची शाश्वती उद्योग व्यवसायातील लोकांना राहिलेली नव्हती. असुरक्षिततेची भावना वाढीस लागलेली होती. अशाच कालावधीत साळसकरांकडे आलेल्या या विभागामुळे कोठेतरी आशेचा किरण दिसू लागला होता. साळसकरांनी खंडणीविरोधी पथकाची जबाबदारी एक आव्हान म्हणूनच स्वीकारली होती. सर्वप्रथम साळसकरांनी खबऱ्यांचे जाळे सर्वदूर पसरविले. त्या माध्यमातून कोण कोणाकडे खंडणी मागायला किंवा कोणाचा गेम करायला जाणार हे साळसकरांना आधीच कळत होते. त्यानुसार ते सापळा रचून खंडणीबहाद्दरांना अलगद पकडायचे. जर एखाद्याने त्यांच्या हातून निसटण्याचा प्रयत्न केलाच तर तो एन्काऊंटरमध्ये मारला जायचा. त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत सुमारे ७५ एन्काऊंटर करून गुन्हेगारी जगताची झोपच उडवून दिली होती. त्यामुळेच प्रसिद्धिमाध्यमांनी त्यांना एन्काऊंटर स्पेशालिस्ट ही उपाधी दिली होती ती उगीच नव्हे.


साळसकर यांची पोलीस दलात कर्तव्यकठोर व शिस्तप्रिय अधिकारी म्हणून ओळख असली तरी घरात मात्र ते कुटुंबवत्सल होते. घर आणि ऑफिस या दोन्ही गोष्टी त्यांनी अखेरपर्यंत स्वतंत्रच ठेवल्या. घर आणि ऑफिसमध्ये त्यांनी कधीच गल्लत होऊ दिली नाही. हल्ली बरेच जण कामावरून घरी परतल्यावर दिवसभरात जे काही घडते, त्याचा पाढा कुटुंबीयांसमोर वाचत असतात. तो त्यांचा दिनक्रम ठरलेलाच असतो. मात्र साळसकर दिवसभर ऑफिसमध्ये काय काम करायचे, त्यांना कोणकोणते अनुभव यायचे, कोणती कामगिरी पार पाडली या साऱ्या गोष्टी ते त्यांच्याजवळच ठेवायचे. घरात पाऊल ठेवले की खाकी वर्दी उतरवून ते एका कुटुंबवत्सल



साळसकर, पत्नी
स्मिता व तत्कालीन
पोलीस महासंचालक
अरविंद इनामदार.

कुटुंबप्रमुखाचा वेश परिधान करायचे. त्यांनी एखादी मोठी कामगिरी बजावली की पत्नी स्मिता व कन्या दिव्याला ते दुसऱ्यादिवशी वर्तमानपत्रात वाचल्यावर कळायचे. साळसकर प्रसिद्धीलोलूपही नव्हते व आत्मप्रौढीही नव्हते. वर्तमानपत्रात त्यांच्याविषयी काही छापून आले की, कन्या दिव्या त्यांना म्हणायची, 'पप्पा, आज तुमचे नाव पेपरमध्ये आले आहे.' हे ऐकून 'हो का' इतकीच त्यांची प्रतिक्रिया असायची. त्यावर दिव्या चिडून म्हणायची, 'पप्पा तुम्ही ऑफिसमध्ये काय काम करतात ते काहीच सांगत नाही. डॉक्टर, वकील काय काम करतात ते मला ठाऊक आहे; पण तुम्ही नेमके काय करतात तेच कळत नाही. एक दिवस तुमच्या ऑफिसमध्ये येऊनच तुम्ही काय काम करता ते पहावे लागणार आहे.' आपल्या लाडक्या लेकीच्या उत्सुकतेवरदेखील साळसकर केवळ हसून विषयाला कलाटणी द्यायचे.

**साळसकर कन्या दिव्यासोबत.**



आठवड्यातील सहा दिवस ते त्यांच्या दैनंदिन कामात व्यस्त असायचे. मात्र रविवारचा दिवस ते पत्नी व मुलीसाठी राखून ठेवायचे. निसर्गप्रेमी असलेल्या साळसकरांना पर्यटनाची नितांत आवड होती. फावल्या वेळेत नकाशांचे वाचन करायचे. महाराष्ट्रातील भौगोलिक माहितीचे त्यांच्याकडे भांडारच होते. तसेच विविध आकारांचे रंगीबेरंगी दगडगोटे व पक्ष्यांचे पंख जमविण्याचा त्यांना छंद होता. त्यांच्याकडे असलेल्या 'आडवाटेवरचा महाराष्ट्र' हे पुस्तक वाचून दरवर्षी ते वर्षातून एकदा पत्नी व मुलीला घेऊन महाराष्ट्रातील दुर्गम भागात फेरफटका मारायचे. मुलीला गड, किल्ले व ऐतिहासिक स्थळे दाखविण्यात त्यांना आनंद वाटायचा. याचाच एक भाग म्हणून नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात ते कुटुंबाला घेऊन रेखोल येथे गेले होते. तीन दिवसांच्या या मुक्कामात त्यांनी प्राधान्यक्रमाने कुलदेवता साळसीचे मनोभावे दर्शन घेतले होते. यावेळी त्यांच्यासमवेत अरुण चित्तेदेखील होते.

पोलीस दलात मोठ्या हुद्यावर कार्यरत असलेला हा कर्तव्यकठोर अधिकारी कुटुंबासाठी मात्र फारच मृदू स्वभावाचा होता. अनाठायी बडबड करण्याऐवजी कामापुरतेच तेही मोजकेच बोलण्याचा त्यांचा शिरस्ता होता. सकाळी उठून रोज न चुकता एक तास व्यायाम, त्यानंतर नास्ता घेतल्यानंतर दुपारचा डबा सोबत घेऊन साळसकर कामात रमून जायचे. संध्याकाळी कामावरून परतल्यावर एक तास चालण्याचा व्यायाम करायचे. रात्री भोजनानंतर पोलीस दलाशी संबंधित व अन्य अवांतर पुस्तकांचे वाचन, नकाशा वाचन करण्यासोबत लॅपटॉप उघडून विविध विषयांवरील आपले ज्ञान अधिक अद्ययावत करीत बसायचे. सुटी असो की ड्यूटी रात्री अडीच वाजेनंतरच ते झोपत असत. या नित्यक्रमात काही केल्या बदल होत नसे. त्यांच्या आवडी–निवडी जपताना व छंद जोपासण्यासाठी पत्नी व मुलीकडून त्यांना नेहमीच हवे ते सहकार्य मिळायचे.

## अखेरची लढाई

२६ नोव्हेंबर रोजी रात्री सव्वानऊ वाजेच्या सुमारास साळसकर ड्यूटी आटोपून आपल्या गोरेगाव येथील अहिंसा टेरेस इमारतीतील ६०१ मधील निवासस्थानी परतले. त्यांच्यासोबत चालक अरुण चित्ते होते. ते चित्तेला म्हणाले, 'रोज तुला जायला उशीर होतो, आज लवकर निघ.' साहेबांची गाडी एम.टी. सेक्शनला लावून चित्ते आपल्या सायन येथील निवासस्थानाकडे निघाले. साळसकरांचे जेवण आटोपले होते. त्यानंतर अचानक त्यांचा फोन खणखणला. लिओपोल्ड कॅफेजवळ फायरिंग झाल्याचा निरोप त्यांना क्राईम ब्रँचचे अतिरिक्त पोलीस आयुक्त देवेन भारती यांच्याकडून मिळाला. नेमके काय घडले, याबाबत सहकाऱ्यांकडून त्यांनी माहिती घेतली. घराकडे निघालेल्या अरुण चित्तेना घटनेची माहिती देऊन गाडी मेट्रोजवळ आणण्याची सूचना त्यांनी केली. काही क्षणानंतर पुन्हा फोन. ते पत्नीला म्हणाले, 'आता मला जायलाच हवे. टीव्ही सुरू ठेव आणि काय काय घडते ती माहिती मला पुरवित रहा.' एवढे सांगून साळसकर

निघण्याच्या तयारीत होते. सुसाट तरीही सुरक्षित गाडी चालविण्याची साळसकरांची सवय होती. ते ओळखून त्यांच्या पत्नी त्यांना म्हणाल्या, 'गाडी जपून चालवा.' अतिरेक्यांनी मुंबईवर हल्ला केल्याचे समजताच साळसकर मनाने केव्हाच घटनास्थळी पोहोचले होते. घरात फक्त ते देहाने हजर होते. त्यामुळे पत्नीचा शब्द त्यांच्या कानावर पोहोचेपर्यंत ते मार्गस्थ झाले होते. साळसकर लढाईवर निघताच त्यांच्या पत्नीने टीव्ही सुरू करून प्रत्येक घडामोडीची बित्तंबातमी त्या साळसकरांना देत होत्या. त्यामुळे अतिरेक्यांच्या कारवाया त्यांना कळत होत्या.

अतिरेक्यांनी पहिला हल्ला चढविला तो लिओपोल्ड कॅफे, त्यापाठोपाठ छत्रपती शिवाजी टर्मिनसवर. त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात जीवितहानी घडल्याची वार्ता कानावर येताच हेमंत करकरे आपल्या ताफ्यासह त्याठिकाणी पोहोचले. साळसकरदेखील गोरेगाव येथील निवासस्थानातून निघून सीएसटीकडे आले. त्यांच्यासोबत पोलीस उपायुक्त संजय मोहिते व काही कॉन्स्टेबल होते. त्या सुमारास पोलीस उपायुक्त वसंत कोरेगावकरदेखील तेथे पोहोचले होते. या सर्वांनी बुलेटप्रूफ जॅकेट अंगात परिधान करून आपला मोर्चा टाइम्स ऑफ इंडियाच्या गल्लीकडे वळवला होता. टाइम्स गल्लीतून ग्रेनेडचे हल्ले व गोळीबाराचे आवाज होत असल्याने करकरे यांनी कोरेगावकर यांना सीएसटीकडे जाण्यास सांगितले. गोळीबाराच्या आवाजाच्या दिशेने या सर्वांनी सुमारे पंधरा मिनिटे फायरिंग केली. त्याचवेळी आझाद मैदानाकडून निघालेले अशोक कामटे हेही या तिघांना येऊन मिळाले. त्यांच्यासोबत जयवंत पाटील होते. हे चौघेजण एकमेकांना कव्हर करीत टाइम्स गल्लीतून पुढे सरकत होते. त्याच सुमारास कामा इस्पितळाजवळच्या इमारतीनजीक ग्रेनेडचा स्फोट झाल्याने मोहिते त्या दिशेने पुढे सरसावले, तर करकरे, साळसकर व कामटे यांनी काही कॉन्स्टेबलसह पायीच पुढे आगेकूच केली. अतिरेक्यांनी मुंबईवर केलेल्या हल्ल्याचे थेट प्रक्षेपण पाहून साळसकर कुटुंबीय अनामिक भीतीने भयभीत झाले होते. मनात नको ते विचार रेंगाळू लागले होते. अखेर स्मिता साळसकर यांना राहवले नाही. त्यांनी भ्रमणध्वनीवरून साहेबांची चौकशी केली. दूरदर्शनवर बरेच काही दाखविले जात आहे. तुम्ही नेमके कोठे आहात, साळसकर पूर्ण ताकदीनिशी मोहिमेत हरवून गेले होते. त्यांच्याकडे क्षणाची उसंत नव्हती. त्यामुळे ते पत्नीला फक्त 'मी स्पॉटवर आहे, नंतर फोन करतो' एवढे सांगून निरोप घेतला.

साळसकरांचे पत्नीशी व स्मिता साळसकर यांचे पतीशी हा तुटक स्वरूपात झालेला संवाद अखेरचा ठरेल याची यत्किंचितही कल्पना दोघांना नव्हती. फोन ठेवत नाही तोच पायधुनी विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त भामरे यांची गाडी त्या ठिकाणी पोहोचली. ती गाडी थांबवून साळसकरांनी स्टेअरिंग आपल्या ताब्यात घेतले. त्यांच्या शेजारी करकरे व कामटे बसले. पाठीमागे बाळासाहेब भोसले, जयवंत पाटील, योगेश पाटील व अरुण जाधव बसले. पायधुनी विभागाचे भामरे यांना त्याच ठिकाणी

## *हत्यार कोणाकडे हवे?*

***माझे*** *पप्पा खंडणीविरोधी पथकाचे प्रमुख होते. त्यांनी अनेक गुंडांना वठणीवर आणले होते. अनेकांचे गुन्हे उघडकीस आणले होते. त्यामुळेच ते गुंडांच्या डोळ्यात खुपत होते. गुंडांकडून कोणत्याही क्षणी त्यांच्या जीवाला धोका पोहोचू शकत होता. अशा कर्तव्यकठोर अधिकाऱ्याला स्वत:च्या रक्षणासाठी व गुंडांना जेरबंद करण्यासाठी अत्याधुनिक शस्त्र असणे आवश्यक होते. त्यासाठीच शासनाने त्यांना एके–५६ रायफल दिलेली होती. नंतर तीन वर्षांपूर्वी काय दुर्बुद्धी सुचली कोण जाणे ती रायफल त्यांच्याकडून काढून घेण्यात आली. अत्यंत धोकेदायक असलेल्या विभागाच्या प्रमुखपदी असलेल्या अधिकाऱ्याकडे एके–५६ राहायला नको तर अजून कोणाकडे राहावयास हवी असा रास्त सवालही शहीद विजय साळसकर यांची कन्या दिव्याने उपस्थित केला.*

### *कसाबला जाहीर फाशी द्यावी*

*माझ्या पप्पांसह पोलीस दलातील अनेक अधिकारी, कर्मचारी व निष्पाप लोकांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या कसाबलादेखील जिवंत राहण्याचा कोणताच अधिकार नाही. हल्ल्यासंबंधीची सर्व महत्त्वाची माहिती त्याच्याकडून काढून घेतल्यानंतर त्यास भरचौकात जाहीरपणे फाशी द्यायला हवी, अशा शब्दात दिव्या हिने आपला संताप व्यक्त केला.*

थांबावयास सांगून गाडी रंगभवनच्या दिशेने पुढे निघाली. त्याच सुमारास कामा इस्पितळात गोळीबार व ग्रेनेडचा हल्ला करून खाली आलेले कसाब व इस्माईल शहरात जाण्यासाठी एखाद्या वाहनाच्या प्रतीक्षेत रंगभवनजवळील एटीएम सेंटर समोरच्या झुडपाजवळ दबा धरून बसले होते. तेवढ्यात त्यांना समोरून एक पोलीसवाहन येताना दिसल्याने ते सावध झाले. रंगभवनच्या झुडपाजवळ काहीतरी हालचाल होत असल्याचा संशय साळसकर व कामटे यांना आला. त्याचक्षणी साळसकर यांचा पाय ब्रेकवर पडला. त्यांनी झुडपाच्या दिशेने गोळीबार केला. त्यातील एक गोळी कसाबच्या हाताला लागली. त्यानंतर कामटे यांनी झाडलेली गोळी कसाबच्या त्याच जखमी हाताला लागताच त्याच्या हातातील एके –५६ रायफल खाली पडली. कसाब जखमी झाल्याचे पाहताच इस्माईलने गाडीच्या समोर येऊन बेछुट गोळीबार केला. स्वयंचलित रायफलीतून निघालेल्या गोळ्यांनी गाडीत बसलेल्या तिघा जिगरबाज अधिकाऱ्यांसह पाठीमागे बसलेल्या तिघा पोलीस कर्मचाऱ्यांच्या शरीराची चाळण झाली. अंगात बुलेटप्रूफ जॅकेट असल्यामुळे करकरे, कामटे व साळसकर यांना खाली वाकून स्वत:चा बचाव करता आला नाही. मुंबईवरील हल्ल्याला परतावून लावण्याच्या इराद्याने व अतिरेक्यांना कंठस्नान घालण्याच्या जिद्दीने मोहिमेवर

निघालेले भारतमातेचे तिन्ही सुपुत्र साळसकर, करकरे व कामटे अतिरेक्यांच्या तुफानी हल्ल्यात शहीद झाले. त्यांच्यासमवेत असलेल्या बाळासाहेब भोसले, जयवंत पाटील व योगेश पाटील यांनाही याचवेळी वीरमरण आले. मोठ्या हुद्द्यावर असलेले तीन ज्येष्ठ पोलीस अधिकारी व तीन कर्मचारी एकाचवेळी शहीद होण्याची दुर्घटना बहुधा पहिल्यांदाच घडली होती. याच वाहनात पाठीमागे बसलेले पोलीस कर्मचारी अरुण जाधव केवळ जखमी झाले होते.

गाडीत बसलेल्या पोलीस अधिकाऱ्यांकडून प्रतिकार थांबल्याची खात्री करून कसाब व इस्माईल गाडीच्या दिशेने पुढे सरसावले. त्यांनी करकरे, साळसकर व कामटे यांचे मृतदेह गाडीबाहेर काढून रस्त्यावर टाकले व मागील सीटवर असलेल्या मृत पो–लीस कर्मचाऱ्यांना गाडीतच ठेवून पलायन केले. अतिरेक्यांशी लढताना वीरमरण आलेल्या लढवय्या करकरे, साळसकर व कामटे यांना तात्काळ रुग्णालयात हलविण्यासाठी वेळेवर कोणीच पोहोचू न शकल्याने घटनास्थळी तासभर पडून राह–ावे लागले. देशाच्या या शूर शिपायांच्या पदरी वीरमरणानंतरही उपेक्षाच आली. अतिरेक्यांशी लढताना साळसकर शहीद झाले होते. विविध गुन्हे उघडकीस आणून गुन्हेगारांमध्ये पोलिसांविषयी दरारा निर्माण केलेल्या, गुन्हेगारांसाठी कर्दनकाळ ठरलेल्या या शूर लढवय्यावर काळाने झडप घातली होती. अतिरेक्यांच्या तावडीतून मुंबईची सहीसलामत करण्यासाठी जीवाचे रान करणारा कर्तव्यदक्ष, कर्तव्यकठोर अधिकाऱ्याने आपल्या प्राणाची बाजी लावलेली होती. एक प्रसिद्धी झोतात असलेले प्रकाशपर्व काळाच्या घनघोर अंधारात गडप झाले होते. मात्र दुर्घटना घडल्यानंतरही साळसकर कुटुंबीयांच्या कानावर बराच वेळेपर्यंत ती वार्ता पोहोचलेली नव्हती. बहुधा ती वार्ता पोहोचविण्याचे धाडस कोणात उरलेले नसावे.

रात्री अचानक स्मिता साळसकर यांना त्यांची मैत्रीण अपर्णाचा फोन आला. त्या म्हणाल्या, 'साहेब जखमी झाल्याचे टीव्हीवर दाखवत आहेत.' त्यानंतर मैत्रिणीचा निरोप ऐकून स्मिता साळसकर यांनी टीव्ही सुरू केला तोच त्यांच्याच अहिंसा अपार्टमेंटमध्ये राहत असलेली त्यांची बहीण सौ. रेखा पत्की व त्यांचे पती गिरीश पत्की आले. तोपर्यंत टीव्हीवर विजय साळसकर शहीद झाल्याची स्ट्रीप सुरू झालेली होती. हे सर्व पाहून, ऐकून स्मिता साळसकर गर्भगळीत झाल्या होत्या. त्यांचे सारे काही त्याच क्षणी संपले होते. कन्या दिव्या ओक्साबोक्सी रडून जीवाचा आकांत करीत होती. ते हृदय पिळवटून टाकणारे व दगडालाही पाझर फोडणारे वातावरण पाहून नेमकी कोणी कोणाला समज घालावी हे सारे काही शब्दातीत होते.

गुरुवारी दुपारी शहीद साळसकर यांचे पार्थिव गोरेगाव पूर्व येथील त्यांच्या अहिंसा अपार्टमेंटमधील निवासस्थानी अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. अंत्यदर्शनासाठी येणारा प्रत्येक नागरिक साळसकरांच्या कर्तृत्वाचे गुण गात हळहळ व्यक्त करीत होता. दुपारी चार वाजेच्या सुमारास गोरेगावमधील प्रतापनगरच्या स्मशानभूमीत साळसकर



वीरपत्नी स्मिता साळसकर व कन्या दिव्या यांच्याकडे धनादेश सुपूर्द करताना राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील.

यांचे लहान बंधू दिलीप यांनी पार्थिवाला अग्नी दिला. पोलिसांनी मानवंदना दिली. हवेत झाडलेल्या फैरींचा आवाज व उपस्थितांनी दिलेल्या 'विजय साळसकर अमर रहे'च्या घोषणांनी गगन भेदून निघाले. एक कर्तव्याशी प्रामाणिक राहणारा, वर्दीशी इमान राखणारा आणि कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी जीवाचे रान करणारा एकमेवाद्वितीय पोलीस अधिकारी अनंतात विलीन झाला होता.

**साळसकरांच्या इच्छेनुसारच अस्थिविसर्जन**

छत्रपती शिवाजीमहाराज आणि श्री परशुराम हे माझे प्रेरणास्थान आहे. मृत्यू कधी, कोठे व कसा येईल हे सांगता येत नाही. माझा मृत्यू कोठेही झाला तरी माझ्या अस्थी परशुराम भूमीतच विसर्जित कराव्यात, अशी इच्छा शहीद साळसकर यांनी वीरमरण येण्याआधीच कुटुंबाजवळ व्यक्त करून ठेवली होती. अतिरेक्यांच्या हल्ल्यात वीरमरण आल्यानंतर कुटुंबातील सदस्यांना साळसकर यांचे शब्द आठवले. त्यांच्या इच्छेनुसारच चिपळूणमधील वाशिष्ठी नदीत 'विजय साळसकर अमर रहे' व 'वंदे मातरम्'च्या घोषणांनी पेठमाप येथील वाशिष्ठी नदीचा परिसर गलबलून गेला होता. साळसकर यांची लाडकी कन्या दिव्या हिच्या हस्ते अस्थी विसर्जित करण्यात आल्या. त्याप्रसंगी तिने

पप्पांच्या आठवणींना उजाळा दिला.

दिव्या म्हणाली, वर्षभरापूर्वीच आम्ही या ठिकाणी आलो होतो. पप्पा, परशुरामाचे भक्त होते. छत्रपती शिवाजीमहाराज व परशुराम या दैवतांवर त्यांची श्रद्धा होती. देशासाठी काहीतरी करायचे हीच त्यांची जिद्द होती. पोलीस दलाचाच विषय त्यांच्या मनात सतत घोळत राहायचा. आज ते शहीद झाले, असा शब्द उच्चारणेदेखील मनाला पटत नाही. कर्तृत्ववान पप्पांविषयी भरभरून बोलणाऱ्या लेकीच्या तोंडून निघालेल्या शब्दांनी उपस्थित गहीवरले होते. याप्रसंगी दिव्याची मावशी रेखा पत्की, काका गिरीश पत्की व पप्पांचे मित्र अभय भाटवडेकर उपस्थित होते.

**साळसकर यांची यशस्वी कामगिरी**

गुन्हे अन्वेषण विभागाच्या युनिट क्रमांक ९च्या प्रमुखपदी असताना विजय साळसकर यांनी उघडकीस आणलेले विविध गुन्हे...

- सीबीआय अधिकारी असल्याचे भासवून एका घरातून एक कोटी तीस लाख रुपयांची रोकड पळवून नेणाऱ्या भामट्यांसह कुंदन वैष्णवला मुद्देमालासह अटक.
- बांद्रा येथील नवीन उड्डाणपुलाजवळ डी.के.राव टोळीतील प्रख्यात गुंड बाळा किरवे व त्याचा साथीदार सुनील नेपाळी हे दोघे चोरी करण्यासाठी येत असल्याची खबर मिळताच त्यांना चकमकीत जखमी करून ताब्यात घेतले.
- वांद्रे येथील कॉसमॉस बँकेवर दरोडा टाकण्यासाठी येत असल्याची माहिती मिळताच सापळा रचून विजयसिंग ठाकूर, रवि मर्चण्टडे, समीर शेख, वेलू देवेंद्र, लालबहादूर रॉय, सिकंदर शेख, विजय मोरे, जितेंद्र ठाकूर यांना शिताफीने अटक.
- वांद्रे पश्चिम येथील रिझवी कॉलेजजवळील ब्ल्यू बर्ड अपार्टमेंट येथे महागडी गाडी घेऊन एक आरोपी येत असल्याची माहिती मिळताच त्या ठिकाणी दबा धरून बसलेल्या पोलिसांनी मुंबईतील १९९३च्या बॉम्बस्फोटातील प्रमुख आरोपी यडा याकूबचा मुलगा याकूब खानला अटक.
- बंगळुरूमधून ममता या युवतीला घेऊन फरार झालेला तिचा प्रियकर क्रांतीकुमार शास्त्री व त्याचा साथीदार जहूर मेहबूब पाशा या दोघांना मुंबईत अटक.
- सायन परिसरातील हॉटेल व्यावसायिकाची हत्या करण्यासाठी येत असल्याची खबर मिळताच सापळा रचून हेमंत पुजारी टोळीतील किसन राठोड व रोहन सेठ या गुंडांना शरण येण्याचे सांगताच त्यांनी गोळीबार केला. प्रत्युत्तरादाखल केलेल्या गोळीबारात ते दोघे ठार.
- सन १९९८ पासून स्वीस कॉमचे सीमकार्ड वापरून खंडण्या वसूल करणाऱ्या मनीष शांतीलाल शहा यास अटक.
- सन २००१ : कट्टा शेखर आणि डी.के.राव टोळीतील खतरनाक गुन्हेगार बाळकृष्ण ऊर्फ भास्कर ऊर्फ बालन्ना देजू शेट्टीला गोकुळधाम परिसरातील बारमध्ये अटक.

- सन २००१ : बेकायदेशीर टेलिफोन एक्स्चेंजचा व्यवसाय करणाऱ्या हेमांग देसाईला अटक.
- सन २००४ : विविध गुन्ह्यांमध्ये असलेल्या हेमंत पुजारी टोळीतील दिनेश शेट्टी व अनिल नारायण सॅलियन या म्होरक्यांना पकडण्यात यश.
- सन २००४ : बेकायदा लग्न लावून देणाऱ्या व घटस्फोट मिळवून देणाऱ्या बालाजी मॅरेज ब्युरोच्या अश्विनी ताटे, जयेंद्र घोलप व नोटरी अजयकुमार मारू यांना ताब्यात घेतले.
- सन २००४ : करोडो रुपयांच्या संपत्तीचे आमिष दाखवून दीपेश गोहेल नावाच्या राजकोटच्या व्यापाऱ्याची फसवणूक करणाऱ्या नायजेरीयातील हॅरिसन एडवर्ड व पीटर जॉन्सन यांना अटक.
- सन २००४ : ठाण्यातील एका व्यापाऱ्यास हजारो डॉलर्सच्या पार्सलचे आमिष दाखवून फसविण्यासाठी आलेल्या नायजेरीयन इब्राहीम टॅगोला जेरबंद केले.
- सन २००४ : उद्योजक जतीन शहा यांची अपहरणकर्त्यांच्या तावडीतून सुटका.
- सन २००४ : बिल्डरकडून एक कोटीची खंडणी मागणाऱ्या छोटा राजन टोळीचा प्रमुख गुंड प्रमोद जठारला अटक.
- सन २००४ : कोल्हापूर कारागृहातून फरार झालेल्या छोटा शकील टोळीचा खतरनाक गुन्हेगार राहुल दांडगेला अटक.
- सन २००४ : हर्षालीनामक १४ वर्षीय बालिकेच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकण्यास सांगणाऱ्या लायझा डिसिल्व्हा व ॲसिड फेकणाऱ्या अग्नेल फर्नांडिसला अटक.
- सन २००४ : नोकरीचे आमिष दाखवून नऊ जणांची नऊ लाख रुपयांची फसवणूक करणाऱ्या संदीप रॉयला अटक.
- सन २००५ : पेट्रोल पंपावर कॅशिअरचे काम करणाऱ्या कल्पना पिळणकर यांच्याकडून आठ लाखांची रोकड पळवून नेणाऱ्या विक्रमसिंग जयदेव मिश्रा, रणजीत पटनाईक, मनीकुमार नायर या चौघा बदमाशांसह त्यांचा म्होरक्या सुंदर थापा ऊर्फ बचन राय यास नेपाळ सीमेवरून अटक.
- सन २००५ ते २५ नोव्हेंबर २००८ : तपासकार्यातील आपल्या खास शैलीमुळे अनेक मोठमोठे गुन्हे उघडकीस आणले. गुन्हेगारी जगताचे कंबरडे मोडून काढताना सुमारे ७५ एन्काऊंटर करून खतरनाक गुंडांना यमसदनी धाडले.

॥



स्वतःचा जीव धोक्यात घालून कामा
इस्पितळाच्या पाचव्या मजल्यावरील
निष्पाप जीवांच्या रक्षणाची धुरा लीलया
पेलणाऱ्या प्रकाश मोरे यांच्या बलिदानाने
भारतमातेची कूस धन्य झाली आहे...
कोंडमालुसऱ्याच्या या तानाजीच्या
त्यागाने जन्मभूमीही पावन झाली आहे.

## स्वभावाने अबोल, कर्तृत्वाने बोलके

# प्रकाश मोरे

**कामा** इस्पितळ गाठण्याच्या केवळ अठरा मिनिटे आधी रात्री १०.४५ वा. मुलुंडच्या एल. टी. मार्ग पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक प्रकाश मोरे यांनी घरी पत्नी माधवी मोरे यांना फोन केला –

***'शहरात नाकाबंदी आहे, अतिरेकी घुसलेत.***
***सकाळी बाहेर निघू नका.'***

– शहीद प्रकाश मोरे यांचा पत्नी माधवीशी झालेला हा अखेरचा संवाद.

कामा इस्पितळाच्या चौथ्या मजल्यावर अतिरेक्यांनी काही जणांना ओलिस ठेवल्याची खबर अतिरिक्त पोलीस आयुक्त सदानंद दाते यांना मिळाली. दाते क्षणाचाही विलंब न करता आझाद मैदान पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय पवार, हवालदार शिंदे यांच्यासह कामा इस्पितळाकडे निघाले. महापालिका मार्गावरील रस्त्यावर उभ्या असलेल्या विजय खांडेकर यांना व गस्तीसाठी नेमणूक करण्यात आलेल्या लोकमान्य टिळक मार्ग पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक प्रकाश मोरे यांना सोबत घेऊन रात्री ११.०३ वाजता कामा इस्पितळ गाठले. यावेळी या पथकातील सर्वांकडेच पुरेसा शस्त्रसाठा होता. कामा इस्पितळात पोहोचल्यावर हा सर्व ताफा लिफ्टच्या साहाय्याने पाचव्या मजल्यावर गेला. त्याठिकाणी उपस्थित असलेल्या वॉचमनकडून अतिरेकी सहाव्या मजल्यावर व टेरेसवर असल्याची माहिती मिळाली.

दाते यांनी सर्व सहकाऱ्यांना सावध राहण्याच्या सूचना केल्या. माहिती मिळताच या ताफ्याने आपला मोर्चा सहाव्या मजल्याकडे वळवला. त्याठिकाणी पोहोचताच दाते टेरेसच्या दिशेने सावधपणे गेले. टेरेसवर कोण आहे का याची खात्री करण्यासाठी त्यांनी एक धातूचा तुकडा फेकला. कोणीतरी आले असे समजून अतिरेक्यांकडून तुकड्याच्या दिशेने गोळ्यांच्या फैरी झाडण्यात आल्या. अतिरेकी आणि पोलीस अधिकारी दोघेही आपापल्या ठिकाणी लक्ष्य टिपण्याच्या तयारीत होते. दाते, खांडेकर व मोरे यांनी सहाव्या मजल्यावर येऊन जिन्याजवळ पोझिशन घेतल्या. त्याचवेळी नियंत्रण कक्षाला वाढीव कुमक पाठविण्याचा संदेश देण्यात आला. पाचव्या मजल्यावर असलेले निष्पाप बालक, महिला व परिचारिका यांच्या संरक्षणाची जबाबदारी या पथकावर असल्याने मोरे, खांडेकर व दाते मृत्यू तळहातावर घेऊन अतिरेक्यांशी झुंज देत होते. अतिरेकी कोंडीत सापडले होते. त्यांना बाहेर पडायला जागा नव्हती. यातून मार्ग काढावा व पोलिसांचा पेच सैल करण्याच्या उद्देशाने त्यांनी जिन्याच्या दिशेने हॅण्ड ग्रेनेड फेकला. त्यात मोरे आणि खांडेकर गंभीर जखमी झाले तर दाते यांच्या डोळ्यालाही जखमा झाल्या. अंगावरील जखमा सोबत घेऊन मोरे व खांडेकर हे शूर जवान अतिरेक्यांवर तुटून पडले होते. सुमारे अर्धा तास गोळ्यांच्या फैरी व हॅण्ड ग्रेनेडस्‌चा मारा सुरू होता. खांडेकरांनी आपल्या वायरलेसवरून 'आम्हाला मदत पाठवा' हा शेवटचा संदेश देऊनही त्यांच्यापर्यंत मदत पोहोचलेली नव्हती. रात्री १२.४५ वाजेच्या सुमारास अतिरिक्त पोलीस आयुक्त टेमकर घटनास्थळी पोहोचले. तोपर्यंत प्रकाश मोरे व विजय खांडेकर या अंगात वीरश्री संचारलेल्या सच्चा शिपायांनी जगाचा निरोप घेतलेला होता. कामा इस्पितळाच्या पाचव्या मजल्यावरील निष्पाप जीवांच्या रक्षणाची धुरा आपल्या खांद्यावर लीलया पेलणाऱ्या या शूर शिपायांनी स्वत:चा जीव धोक्यात घालून इतरांच्या प्राणांचे रक्षण केले होते. त्यांच्या बलिदानाने भारतमातेची कूस धन्य झाली होती.

रात्री २ वाजेच्या सुमारास माधवी मोरे यांचा फोन खणखणला. तो फोन एल.टी. मार्ग पोलीस ठाण्यातून करण्यात आलेला होता. प्रकाश मोरे शहीद झाल्याचा निरोप त्यांच्या धर्मपत्नीला कोणत्या शब्दात सांगावा, असा पेच पोलिसांना पडलेला होता. काहीही शब्द न उच्चारता त्यांनी तो फोन ठेवला. काहीही न बोलता पोलिसांनी फोन ठेवल्यामुळे माधवी मोरे कमालीच्या अस्वस्थ झाल्या. त्यांच्या मनात नको त्या विचारांनी चलबिचल सुरू झाली. त्यांनी लगेचच ठाणे येथे असलेल्या संजय शेलार या भावाला फोन करून घडलेल्या प्रकाराची माहिती दिली. शेलार यांनी त्याच क्षणाला त्यांचे मेव्हुणे प्रकाश मोरे यांच्या मोबाईलवर संपर्क साधला. त्यांना पोलिसांकडून मोरे शहीद झाल्याची दु:खद घटना समजली. शेलार यांना आपली बहीण विधवा झाल्याचे ऐकून प्रचंड धक्का बसला. परंतु बहिणीला तुझ्या कपाळाचे कुंकू पुसले गेल्याचे कोणत्या शब्दात सांगावे हेच त्यांना कळत नव्हते. काहीही न सांगता पत्नीला घेऊन त्यांनी पहाटे पावणेचार वाजता मुलुंड येथील वीर सावरकरनगरमधील बहिणीचे घर

“

## *'देशासाठी काहीतरी करून दाखवायचे'*

***शहीद** प्रकाश मोरे यांच्यापेक्षा मोठा भाऊ चंद्रकांत हेसुद्धा पोलीस दलातच कार्यरत होते. त्यांच्या अकाली निधनाने त्यांची पत्नी एकाकी पडल्या होत्या. पतीच्या मृत्यूनंतर तिला चंद्रकांतच्या जागी नोकरी देण्यात आली. कधी कधी पतीविषयीच्या आठवणींनी ती अस्वस्थ व्हायची. तेव्हा तिला धीर देताना प्रकाश मोरे म्हणायचे, 'अशी हिंमत सोडून कसे चालेल. आपण डिपार्टमेंटमध्ये आहोत. आपल्याला देशासाठी काहीतरी करून दाखवायचे आहे.' कामा इस्पितळात शिरलेल्या अतिरेक्यांशी झुंज देताना शहीद झालेले मोरे अखेर देशासाठी काहीतरी करूनच गेले. शहीद मोरे यांनी अचानक उद्‌भवलेल्या प्रसंगाला तोंड देताना सहजगत्या बलिदान पत्करले नाही किंवा घातपाताने ते मारले गेले नाहीत. अंगावर खाकी वर्दी चढविल्यापासूनच देशप्रेमाने ते भारावलेले होते, याची प्रचिती त्यांच्या वागण्या –बोलण्यातून त्यांच्या कुटुंबीयांना व सहकाऱ्यांना कायमच यायची.*

”

गाठले अन् घरात आक्रोश सुरू झाला. अनुष्का आणि प्रतीकने तर पितृछत्र हरपल्याने घरच डोक्यावर घेतले होते. मुलुंडच्या स्मशानभूमीत शहीद प्रकाश मोरे यांना साश्रूपूर्ण नयनांनी व 'शहीद प्रकाश मोरे अमर रहे'च्या निनादात अखेरचा निरोप देण्यात आला. स्मशानभूमीतून परतणारे नागरिक शहीद मोरे यांच्या स्मृतींना उजाळा देत जड अंत:करणाने माघारी परतले.

प्रकाश पांडुरंग मोरे यांचा जन्म कोंडमालुसरे (ता.महाड, जि.रायगड) येथे १६ ऑक्टोबर १९५९ रोजी एका सर्वसामान्य कुटुंबात झाला होता. त्यांना दत्ताराम आणि चंद्रकांत हे दोन भाऊ व तीन बहिणी आहेत. तीनही बहिणी विवाहित आहेत. मोठा भाऊ पुण्याच्या सीआरटी कंपनीत नोकरीला असून, चंद्रकांत पोलीस दलात नोकरीला असतानाच मयत झाले. मोरे यांनी प्रतिकूल परिस्थितीत बी. ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर ते पोलीस दलात भरती झाले. नोकरीत व्यवस्थित रूळल्यानंतर घरच्यांनी त्यांचा विवाह उरकला. प्रकाश व माधवी मोरे यांचा संसार सुखाने सुरू झाला होता. नंतर त्यांना प्रतीक व अनुष्का ही दोन मुले झाली. प्रतीक संगणक अभियांत्रिकीच्या प्रथम वर्षात तर कन्या अनुष्का आठवीत शिकत आहे.

माधवी मोरे यासुद्धा सेंट्रल गर्व्हमेंट हेल्थ स्कूलमधील नोकरी सांभाळून कुटुंबाची




**वीरपत्नी माधवी मोरे, कन्या अनुष्का व पुत्र प्रतीक.**

देखभाल करीत होत्या. पोलीस उपनिरीक्षक म्हणून पदोन्नती झाल्यापासून त्यांच्यावर कामाचा ताण वाढलेला होता. कामात व्यस्त असल्यामुळे घराकडे लक्ष द्यायला त्यांच्याकडे पुरेसा वेळ मिळत नव्हता. तरीदेखील मुलाशी संवाद साधायची जेव्हा वेळ यायची, तेव्हा ते प्रतीकला म्हणायचे, 'चांगला अभ्यास कर व वरच्या हुद्द्यावरील मोठा अधिकारी बनण्याचे लक्ष्य डोळ्यासमोर ठेव.' छोट्या अनुष्काने सातवीत असताना सायन्समध्ये वीसपैकी वीस गुण मिळविले. त्यादिवशी मोरे खूपच आनंदी होते. पोरीच्या पाठीवरून कौतुकाची थाप फिरविताना त्यांनी 'बेटा अशीच प्रगती कायम ठेव' असा सल्ला अनुष्काला दिला होता. तिनेदेखील वडिलांचा शब्द पाळून वार्षिक परीक्षेत ८० टक्के गुण मिळविले होते. मनमिळावू वृत्ती व कामात झोकून द्यायची तयारी ठेवणारे प्रकाश मोरे त्यांच्या सहकाऱ्यात सर्वांना हवेहवेसे वाटायचे. घरात मात्र ते शांत व कामापुरतेच बोलायचे. रोज सकाळी उठून गणपतीची पूजा न विसरता करणारे मोरे धार्मिक प्रवृत्तीचे होते. मात्र त्यांनी आपल्या भक्तीचे प्रदर्शन कधी केले नाही. रोज बारा तास ड्यूटी व लोकलच्या धावपळीची रोजची दगदग, पोलीस ठाण्यातील जबाबदारी हे सर्व सांभाळताना कुटुंबाकडे लक्ष देणे मोरेंना अशक्य होते. छोटी अनुष्का म्हणते, दोन वर्षांपूर्वी फक्त एकदाच आम्हाला पप्पांनी शांगरीला रिसॉर्ट येथे नेले होते. सर्व कुटुंबाने एकत्रितरीत्या साजरा केलेला तो एकमेव आनंदोत्सव ठरला. त्यानंतर पप्पांना त्यांच्या

कामातून वेळ काढणे कधीच जमले नाही. मात्र पप्पांचा आम्हाला नेहमीच अभिमान वाटत आला. २६ नोव्हेंबरला त्यांनी केलेल्या त्यागाने तर पप्पांविषयीचा अभिमान अजून द्विगुणीत झाला आहे.

अखेरच्या भेटीची आठवण सांगताना श्रीमती माधवी मोरे म्हणाल्या, 'बुधवारी घरातील एका कुलपाची चावी बनविण्यासाठी आम्ही दोघे पती–पत्नी सायंकाळी साडेसहा वाजता स्टेशनवर गेलो होतो. तेथून ते रात्री पावणेआठ वाजता परस्पर ड्यूटीवर जाण्यासाठी निघाले. तेव्हा त्यांना 'सोमवारपासून रजा टाका' असे सांगितले. त्यावर ते हो म्हणून निघून गेले... आमच्यापासून कायमची रजा टाकून ! आता पुढचे आयुष्य एकटीनेच वाटचाल करावी लागणार आहे. ते माझ्यासोबत नसणारच. पोरांचे शिक्षण पूर्ण करायचे आहे, त्यांना आईबरोबरच बापाचेही प्रेम द्यावे लागणार आहे. हे सर्व अशक्यप्राय आहे; मात्र त्यांच्या स्मृतीच आम्हाला आता प्रेरणा देत राहतील, दुसरे काय?

॥



## लेखकाविषयी

१९९० साली संजय वाघ यांनी धुळे येथून 'लोकमत' व 'दै. आपला महाराष्ट्र' या दैनिकांचे वार्ताहर म्हणून पत्रकारितेस सुरुवात केली. त्यानंतर दै. आपला महाराष्ट्र' व 'सायं खान्देश' मध्ये पूर्णवेळ उपसंपादक म्हणून कारकिर्दीस प्रारंभ केला. १९९६ मध्ये 'लोकमत'च्या नाशिक आवृत्तीत उपसंपादक म्हणून ते रुजू झाले. 'लोकमत' मध्येच त्यांची खऱ्या अर्थाने जडणघडण झाली. पत्रकारितेच्या वीस वर्षाच्या काळात सामाजिक बांधीलकीच्या नात्यातून त्यांनी विविध विषय हाताळले. समाजविघातक प्रवृत्तीविरुद्धचा रोष तसेच शोषितांच्या वेदना त्यांनी आपल्या लिखाणातून व्यक्त केल्या. प्रसंगानुरूप लेखनासह विविध स्तंभांचे लेखनही त्यांनी केले. सध्या ते 'लोकमत'च्या नाशिक आवृत्तीत मुख्य उपसंपादक म्हणून कार्यरत आहेत.

‘२६/११ चे अमर हुतात्मे’ हा एकार्थाने चरित्र ग्रंथच आहे. हुतात्म्यांच्या मृत्यूचे मूल्य पचवणारी व्यापक राष्ट्रीय भूमिका, चित्रमय शैलीत वास्तव साकारणारी भाषा, वस्तुनिष्ठ निवेदन, निरीक्षण, आकलन –अवलोकनातून सिद्ध केलेले संशोधन, ‘आँखोदेखा हाल’ सारखी मांडणी, मृत्यूचे तांडव शब्दबद्ध करणारी गंभीर शब्दकळा, कुटुंबीयांच्या नाजूक भावभावनांचा गुंता आकळून समर्थपणे प्रगट करणारी अभिव्यक्तीची पद्धत आणि मुख्यत: हुतात्म्यांच्या रक्ताशी इमान राखणारी अस्सल लेखणी ही संजय वाघ यांच्या ग्रंथलेखनाची वैशिष्ट्ये आहेत.

– प्राचार्य डॉ. श्रीपाल सबनीस




















प्राजक्ता प्रकाशन, नाशिक